# प्रकरण १.
# ब्रिटिश राजसत्तेचा उदय

- पंधराव्या – सोळाव्या शतकात युरोपात औद्योगिक क्रांती झाली. युरोपातील संशोधकांच्या विविध शोधांमुळे तेथे नव्या युगाचा प्रारंभ झाला.
- युरोपात झालेल्या धर्मसुधारणा आणि औद्योगिक क्रांतीमुळे तेथे प्रगत समाजाचा उगम झाला.
- १४५३ पर्यंत भारत – युरोप व्यापार कॉन्स्टॅन्टिनोपल (सध्याचे इटरंबूल) या शहरातून खुष्कीच्या मार्गाने होत असे, परंतु १४५३ साली ऑटोमन तुर्कांनी कॉन्स्टॅन्टिनोपल या शहरावर आक्रमण करुन खुष्कीच्या मार्गे भारताचा व्यापार बंद झाला.
- औद्योगिक क्रांतीमुळे युरोपातील मालाचे उत्पादन मोठया प्रमाणात वाढले होते. युरोपीयांना त्याच्या मालासाठी बाजारपेठांसह आणि अधिक कच्च्या मालाची गरज भासू लागली.



बार्थोलोम्यू डायस

- युरोपात झालेली औद्योगिक क्रांती या क्रांतीतूनच नवीन उद्योग, व्यापार, कच्चामाल यासाठी नवीन भूप्रदेश शोधण्याची युरोपियनांना गरज वाटू लागली. त्यातूनच भारताचा युरोपशी प्राचीन काळापासून व्यापार सुरु होता हे आपल्या लक्षात येते. आशियातून जाणारा खुष्कीचा एकमेव मार्ग बंद झाल्यामुळे युरोपीयांना पुर्वेकडील राष्ट्रांकडे जाण्यासाठी समुद्रमार्गाची गरज भासू लागली. ‘बार्थोलोम्यू डायस’ या पोर्तुगालने भारताकडे येणाऱ्या जलमार्गाचा शोध घेत आफ्रिकेच्या दक्षिण टोकापर्यंत येऊन पोहचला. या टोकाला ‘आशेचे भूशीर’ म्हणतात.

- १५१० साली पोर्तुगीज गव्हर्नर अल्बुकर्क याने विजापुरच्या आदिलशहाकडून गोवा जिंकला आणि हेच पुढे पोर्तुगीजांचे प्रमुख केंद्र बनले.
- अल्बुकर्क याने खऱ्या अर्थाने पोर्तुगीज सत्तेचा पाया रचला. (कोचिन ही पोर्तुगीजांची १ ली राजधानी)
- पोर्तुगीजांचा राज्यविस्तार पाहून डच, फ्रेंच व इंग्रज यांनी व्यापारी कंपन्यांची स्थापना केली आणि भारतात येऊ लागले.



पोर्तुगीज गव्हर्नर अल्बुकर्क



वास्को-द-गामा

- १४९२ साली स्पॅनिश राजा – राणीच्या मदतीने समुद्र पर्यटनास निघालेल्या (स्पेन खलासी) कोलंबस जॉन (अमेरिगो व्हेस्पुसी) या इटालियन खलाशाने अमेरिका खंडाच्या उत्तर, पूर्व व मध्य या भागांचा शोध लावला.
- त्यानंतर लवकरच पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा याने आफ्रिकेच्या दक्षिण टोकाला वळसा घालून २० मे १४९८ रोजी कालिकत बंदरात प्रवेश केला. तेथील राजा झामोरीन याने वास्को-द-गामाचे स्वागत केले.
- १५०२ ला वास्को-द-गामा परत भारतात आला होता. १५१९ - फर्डिनाड मॅगेलॉन (जन्माने पोर्तुगीज, नंतर स्पेनचा नागरिक बनला.) याने सागरी मार्गाने पहिली पृथ्वी प्रदक्षिणा केली.
- पोर्तुगीजांनी सुरुवातीला फक्त व्यापारावर लक्ष केंद्रीत केले.

- पोर्तुगीजांचा भारतातील पहिला व्हॉईसरॉय फ्रान्सिस्को-द-आल्मेडा हा होता. (१५०५ – १५१०)
- पोर्तुगीज भारतात सर्वात प्रथम आले आणि सर्वात शेवटी भारतातून गेले. जवळपास ४५० वर्षे त्यांनी भारतात राज्य केले. (१५१०-१९६१)
- पोर्तुगीज सत्तेला एकाच वेळी धर्मप्रसार, सत्ताविस्तार व व्यापार यांमध्ये यश आले नाही.
- पोर्तुगीजांनी गोवा, दीव-दमण या भागावर दीर्घकाळ वर्चस्व प्रस्थापित केले.
- पोर्तुगीजांनी हिंदी महासागरात मध्य ठिकाणी कष्टम स्टेशन स्थापन केले. आशियाच्या व्यापाऱ्यांना जे ओळखपत्र द्यावे लागते त्याला कार्टस म्हणतात.
- इ. स. १६२५ पासून फ्रेंचानी भारतात व्यापाराला सुरुवात केली.
- चंद्रनगर, पाँडिचेरी (पुद्दुचेरी), येनम, कारिकल व माहे या प्रदेशावर फ्रेंचानी वर्चस्व निर्माण केले.

### ➢ पोर्तुगिजांच्या ऱ्हासाची कारणे -


१. अल्बुकर्कनंतर हिंदूस्थानात कोणीही लायक व्यक्ती गव्हर्नर म्हणून आली नाही.
२. हिंदूस्थानातील पोर्तुगीज अधिकारी हे भ्रष्ट होते.
३. इ.स. १५६५ मध्ये विजयनगरचे साम्राज्य नष्ट झाले. त्यामुळे विजयनगर साम्राज्याशी असलेला व्यापार पूर्णपणे बंद पडला.
४. पोर्तुगिजांचे धार्मिक धोरण हे त्यांच्या ऱ्हासाला कारणीभूत आहे. कारण ख्रिश्चन धर्माच्या प्रसारासाठी त्यांना जे प्रयत्न केले ते भारतीयांना आवडले नाहीत. डॉ. आर. सी. मुजुमदार यांच्यामते पोर्तुगिजांच्या धार्मिक धोरणामुळे एतद्देशीय सत्ता त्यांच्या विरोधात गेल्या आणि त्यामुळेच त्यांचा नाश झाला.
५. पोर्तुगीज सत्तेला मराठा, मोगल यांनी आव्हान दिले होते. इ.स. १६३२ मध्ये मोगल बादशहाने पोर्तुगिजांची हुगळी येथील व्यापारी वखार नष्ट केली व त्यांना कैद केले.
६. इ.स. १५८० मध्ये पोर्तुगाल स्पेनने जिंकला. स्पेन व पोर्तुगाल ही राज्ये एकत्र आली. त्यामुळे हिंदूस्थानातील राज्यांकडे लक्ष देण्यास त्यांना वेळ मिळाला नाही.
७. मुळात पोर्तुगाल हा देश छोटा असल्याने साम्राज्यनिर्मिती करणे व मिळालेले साम्राज्य टिकविणे हे कठीण काम होते.
८. पोर्तुगिजांना भारतात डच व इंग्रज यांच्या स्पर्धेला तोंड द्यावे लागले.
९. पोर्तुगिजांनी भारतीय व्यापाऱ्यांशी चांगले संबंध ठेवले नाहीत. त्यामुळे त्यांना भारतीय व्यापाऱ्यांचे सहकार्य मिळाले नाही.

## ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी

- १५९९ मध्ये लंडनमधील काही व्यापाऱ्यांनी लॉर्ड मेयो यांच्या नेतृत्त्वाखाली एलिझाबेथ (पहिली) राणीच्या अध्यक्षतेखाली 'ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची' स्थापना केली. या कंपनीचा उद्देश पूर्वेकडील आशियाई राष्ट्रांशी व्यापार करणे हा होता.
- ३१ डिसेंबर १६०० रोजी इंग्लंडची राणी एलिझाबेथने या कंपनीला पुर्वेकडील राष्ट्रांशी व्यापार करण्याची १ ली सनद बहाल केली.
- ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची ही सनद फक्त १५ वर्षे मुदतीची होती.
- १६०८ ला ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी मार्फत कॅप्टन हाफीन्स सर्वप्रथम भारतात आला.
- इंग्रज राजाचा वकील थॉमस मन्रो याने जहांगीर बादशहाकडून (१६१५) व्यापारी सवलती मिळविल्या.



ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी




इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स व कॅथरिन

- १६१५ साली त्यानंतर इंग्रजांनी सुरत, मच्छलीपट्टणम्, अहमदाबाद, भजेस, आग्रा, मद्रास, कलकत्ता याठिकाणी वखारी स्थापन केल्या.
- मुंबई हे बेट प्रथम पोर्तुगिजांच्या ताब्यात होते, परंतु इ.स. १६६८ मध्ये त्यांनी ते इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स यास विवाहप्रसंगी आंदण म्हणून दिले. त्याने ते ईस्ट इंडिया कंपनीला वार्षिक दहा पौंड भाडेपट्टीने दिले.
- थोडयाच काळात इंग्रजांनी बंगाल, ओरिसा प्रांतांत जकातमुक्त व्यापार करण्याचे परवाने मिळविले.

- संपुर्ण भारतात इंग्रजांना सत्ता प्राप्त करण्यासाठी पोर्तुगीज, डच, फ्रेंच, मुघल, मराठे, शीख अशा अनेकांशी संघर्ष करावा लागला. (दक्षिणेत निजाम, हैदरअली व मराठे यांच्या सत्तांचा इंग्रजांनी पाडाव केला. रणजितसिंहाच्या मृत्यूनंतर शिखांची सत्ता नष्ट केली.)
- पोर्तुगीजांनी राज्य कारभार करण्याऐवजी धर्म प्रसाराला महत्त्व दिल्याने त्यांची सत्ता भारतात जास्त काळ टिकू शकली नाही.
- भारताशी सर्वप्रथम व्यापारी संबंध पोर्तुगालने निर्माण केले.
- स्पेनने पोर्तुगीजांचा आणि इंग्लंडने हॉलंडचा १६५० च्या सुमारास पराभव केल्यामुळे पोर्तुगीज व डच हे इंग्रजांच्या वाटेतील अडथळे दूर झाले. त्यामुळे इंग्रजांनी आपले लक्ष फ्रेंचाकडे वळवले.
- भारतात व्यापार करताना फ्रेंचांनी ब्रिटिशांना सर्वात जास्त प्रतिकार केला.
- दिल्लीच्या बादशहाने ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीस १६११ मछलीपट्टणम, १६२६ आर्मागाव मध्ये मुक्त व्यापाराची परवानगी दिली.

## ❖ भारतात परकीयांचे आगमन पुढीलप्रमाणे झाले -




- हॉलंडच्या रहिवाश्यांना 'डच' असे म्हणतात.
- स्पेनने आणि इंग्लंडने हॉलंडचा १६५० च्या सुमारास पराभव केल्यामुळे पोर्तुगीज व डच हे इंग्रजांच्या वाटेतील अडथळे दूर झाले. त्यामुळे इंग्रजांनी आपले लक्ष फ्रेंचाकडे वळवले.
- थोडक्यात, भारतात परकीयांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी आपले व्यापारी केंद्रे पुढील ठिकाणी स्थापन केले.
- १६९८ मध्ये ब्रिटिशांनी सुतानती कालीकत व गोविंदपूर या तिन्ही भागाची जमिनदारी मिळवली हीच गावे पुढे कलकत्ता म्हणून उदयास आली.

| व्यापारी केंद्रे | |
|---|---|
| पोर्तुगीज | गोवा, दीव, दमण, मुंबई, चोल इत्यादी |
| इंग्रज | सुरत, मुंबई, मद्रास, कलकत्ता, राजापूर, दाभोळ इत्यादी |
| फ्रेंच | माहे, कालिकत, पुदुचेरी इत्यादी |

- १६९१ मध्ये औरंगजेबाने फर्माण काढून ब्रिटिश ईस्ट इंडियाला बंगालमध्ये ठराविक वार्षिक रक्कमेच्या बदल्यात सिमा शुल्क विरहीत व्यापार करण्याची परवानगी देण्यात आली.


**फारुख सियार**



- १७७१ फारुख सियारने दुसरे फर्मान काढून इंग्रजांना आयात निर्यातीत सूट दिली.
- आयात निर्यात व्यापारात इंग्रजांना सुट देणारा पहिला भारतीय राज्यकर्ता म्हणजेच फारुख सियार होय.
- भारतातून सर्वात प्रथम डच १७९५ मध्ये निघून गेले.
- तसेच इंग्रज भारतातून १५ ऑगस्ट १९४७ रोजी तर पोर्तुगीज १९६१ मध्ये निघून गेले.

- मद्रासचे इंग्रजांच्या काळातील नाव : फोर्ट सेंट-जॉर्ज
- कलकत्त्याचे इंग्रजांच्या काळातील नाव : फोर्ट विल्यम
- ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्यावतीने प्रथम कॅप्टन हॉकीन्स हा १६०८ मध्ये बादशहा जहांगीर यास आग्रा येथे भेटला, परंतु त्याला परत जावे लागले.
- १६१२ मध्ये इंग्रजाचा कॅप्टन वेस्ट याने पोर्तुगीज आरमाराचा पराभव केला.
- १६१५ मध्ये राजा जेम्स पहिला याचा राजदूत सर थॉमस रो हा जहांगीर दरबारी आला.
- १६१५ मध्ये जहांगीराने सूरतला वखार स्थापन करण्याची परवानगी दिली.
- फ्रान्स देशाच्या सरकारने हिंदुस्थानाशी व पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्यासाठी फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी स्थापन केली.


## ❖ भारत सोडून जाण्याचा युरोपियांचा क्रम पुढीलप्रमाणे -




## कर्नाटक युध्द

- इंग्रज व फ्रेंच यांच्यामध्ये सन १७४४ ते १७६३ या दरम्यान ३ युध्दे झाली. ही युध्दे 'कर्नाटक युध्द' म्हणून ओळखली जातात. तिसऱ्या युध्दात इंग्रजांनी फ्रेंचाचा पराभव केला होता.

### ➢ पहिले कर्नाटक युध्द (१७४६ – १७४८) :-



- १७४० मध्ये ऑस्ट्रियाच्या वारसा हक्काच्या युध्दाला सुरुवात झाली हे युध्द जवळपास ८ वर्ष चालले. त्यामध्ये ऑस्ट्रिया व प्रशिया हे दोन मुख्य पक्ष नेते होते. त्यामुळे इंग्रजांनी ऑस्ट्रियाची तर फ्रेंचांनी प्रशियाची बाजू घेतली आणि १७४४ मध्ये इंग्लंड आणि फ्रान्समध्ये युध्दास सुरुवात झाली. याचा परिणाम म्हणून भारतातील इंग्रज आणि फ्रांस यांच्या व्यापारी कंपन्यांमध्ये कर्नाटकात युध्द सुरु झाले.

### मुख्य घटना

- पाँडेचेरी हे फ्रेंचांच्या भारतातील कारभाराचे मुख्य केंद्र होते आणि १७४१ मध्ये फ्रेंचांचा गव्हर्नर जोसेफ डुप्ले याची नियुक्ती पाँडेचेरी येथे करण्यात आली होती.
- १७४५ च्या सुमारास युरोपातील युध्दाचा परिणाम म्हणून भारतात कोरोमंडळ किनाऱ्यावर इंग्रज आणि फ्रेंच आरमारात युध्द झाले आणि इंग्रजाचा पराभव झाला.या परिस्थितीचा फायदा घेऊन फ्रेंच आरमाराचा प्रमुख बार्डोनेसने २१ सप्टेंबर १७४६ रोजी मद्रास ताब्यात घेतले.
- याविरोधात इंग्रजांनी अर्काटचा अन्वरुद्दीनची मदत घेतली, परंतु इंग्रजांकडून जिंकलेले मद्रास अन्वरुद्दीनला देण्याचे आश्वासन देऊन डुप्लेने त्याला फसविले.

## ❖ सेंट थोमची लढाई :

- कर्नाटकातील पहिल्या युध्दातील सेंट थोमची लढाई महत्त्वाची मानली जाते. ही लढाई कर्नाटकाचा नवाब अनुरुद्दीनच्या नेतृत्त्वाखाली भारतीय सैन्य आणि फ्रेंच सैन्य यांच्यात झाली. मद्रास फ्रेंच्यांनी घेतल्यामुळे हा संघर्ष सुरु झाला.
- आपल्या प्रदेशात दोन्ही परकीय कंपन्या लढत असलेल्या पाहून हा संघर्ष बंद करण्याची व प्रदेशात शांतता भंग न करण्याची आज्ञा नवाबाने दिली. त्यावर डुप्लेने असा प्रस्ताव मांडला की मद्रास जिंकल्यावर तो नवाबाला दिला जाईल.

- मात्र प्रत्यक्षात डुप्लेने आपले आश्वासन न पाळल्याने आपली मागणी पुर्ण करण्यासाठी नवाबाने सैन्य पाठवले. या सैन्याचे नेतृत्व कॅप्टन पॅरोडॉईज याच्याकडे होते आणि त्या तुकडीत २३० फ्रेंच सैनिक व ७०० भारतीय सैनिक होते.
- या लहान तुकडीने महफुजखॉंच्या नेतृत्त्वाखाली १० हजार भारतीय सैनिकांना अड्यार नदीजवळ सेंटटोमे येथे पराभूत केले. या विजयामुळे असंघटीत व अप्रशिक्षित भारतीय सैन्याच्या तुलनेत प्रशिक्षित परकीय सैन्याचे श्रेष्ठत्व सिध्द झाले.

## एक्सला चॅपेलचा तह

- एक्स ला चॅपेलचा तह १७४८ मध्ये सेंट थोमच्या लढाई नंतर झाला.
- १७४८ मध्ये 'ऑस्ट्रियन वारसा युध्द' एक्सला चॅपेलच्या तहाने संपुष्टात आले त्यामुळे कर्नाटकाचे पहिले युध्दही समाप्त झाले.
- या तहानुसार इंग्रजांना मद्रास परत मिळाले.
- फ्रेंचांना उत्तर अमेरीकेतील लुईसबर्ग मिळाले.
- पॉंडीचेरीवर आक्रमण न करण्याचे आश्वासन इंग्रजांनी दिले.




## ➤ दुसरे कर्नाटक युध्द (१७४८ – १७५४) :



- भारतीय सत्तेमधील अंतर्गत यादवी व ह्यात इंग्रजांचा व फ्रेंचांचा हस्तक्षेप हे ह्या युद्धाचे कारण आहे.इंग्लंड आणि फ्रांसच्या व्यापारी कंपन्या वेळोवेळी भारतीय सत्ताधिशांना मदत करुन आपला स्वार्थ साधून घेत असे. मे १७४८ मध्ये हैद्राबादचा नवाब निजामाचा मृत्यु झाला आणि त्याचा मुलगा नासिरजंग आणि नातु मुझफ्फरजंग यांच्यात हैद्राबादच्या गादीसाठी वाद सुरु झाला.
- दुसरा वाद अर्काटच्या नवाबपदासाठी अन्वरुद्दीन आणि चंदासाहेब यांच्यात झाला. चंदासाहेब आणि मुझफ्फरजंग यांनी एकमेकांना साहाय्य करण्याचा करार केला आणि जोसेफ डुप्ले या फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीच्या गव्हर्नरने या
- दोघांना पाठिंबा दिला.१७४९ साली अंबुरच्या युध्दात चंदासाहेब, मुझफ्फरजंग आणि फ्रेंच यांनी मिळून अन्वरुद्दीनला पराभूत करुन ठार मारले. फ्रेंचांनी केलेल्या मदतीसाठी त्यांना बराचसा भूभाग आणि मच्छलीपट्टणम बंदर देण्यात आले. त्याचवेळी इंग्रजांनी अर्काटच्या नवाबपदाचा दावेदार अन्वरुद्दीनचा मुलगा महंमदअली आणि निजामाच्या गादीचा दावेदार नसिरजंग यांना पाठींबा दिला




- वरील दोन सत्तांच्या अंतर्गत वादामुळे दुसरे कर्नाटकचे युध्द सुरु झाले.

❖ **अम्बुरची लढाई(१७४९)** :- मुजफ्फरजंग + चंदासाहेब + फ्रेंच यांनी मिळून अन्वरुद्दीनला हरवून ठार केले.

- चंदासाहेब नवाब झाला. फ्रेंचानी मदत केली म्हणून पाँडिचेरी जवळील ८० गावे फ्रेंच कंपनीला दिली.
- वलूवावूर येथे नासिरजंगाचे मुजफ्फरंग व डुप्ले यांच्याशी युध्द झाले. यामध्ये नासिरजंग मारला गेला (डिसेंबर १७५०)
- यानंतर मुझफ्फरजंग दक्षिणेचा सुभेदार बनला त्याने फ्रेंचांना मच्छलीपट्टणम पाँडिचेरीजवळचा मोठा प्रदेश व ५ लाख रुपये दिले.
- डूप्ले कृष्णा नदीच्या दक्षिणेकडील केप कामोरीनपर्यंतच्या प्रदेशाचा गर्व्हनर बनला. डूप्लेने बुसीला हैद्राबादच्या दरबारात ठेवले. मुझफ्फरच्या निधनानंतर निजामाचा तिसरा मुलगा सालाबतजंग गादीवर बसला. त्यांच्याकडून 'नॉर्दन सरकारचे' जिल्हे इंग्रजांना मिळाले. मुस्ताफनगर, एल्लोर, राजमुद्री व चिकाकोल इ.
- त्रिचनापल्ली अन्वरुद्दीनचा मुलगा मुहम्मदअलीने इंग्रजांकडे आश्रय घेतला. किल्ल्याला फ्रेंच व चंदासाहेबाने वेढा दिला. म्हणून इंग्रजांनी फ्रेंचांच्या अर्काटला वेढा दिला. त्रिचनापल्लीची फ्रेंच फौज अर्काटला आली. त्यामुळे त्रिचनापल्ली येथे फ्रेंच हरले.
- १७५४ मध्ये डूप्लेनंतर 'गॉडेव्ह्यू' आला, इंग्रज व गॉडेव्ह्यू (फ्रेंच) यांच्यात पाँडिचेरीच्या तहाने हे युध्द संपले. यानुसार:-
- मद्रास, फोर्ट सेंट डेविड, देविकोटा—ब्रिटिशांकडे आले.
- तर पाँडिचेरी, कारीकल – फ्रेंचांकडे गेले.

## मुख्य घटना

- ऑक्टोबर १७४९ मध्ये त्रिचनापल्ली येथे महंमदअलीला ब्रिटिशांच्या फौजा येऊन मिळाल्या. त्यांनी मद्रास जवळील सेंट थॉमस किल्ल्याचा ताबा घेतला.
- मेजर लॉरेन्सच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश फौजा आणि नासिरजंग यांनी एकत्र येऊन मुझफ्फरजंगला पराभूत केले आणि कैद करण्यात आले. पुढे नासिरजंगाच्या मृत्युनतर फ्रेंचांच्या संरक्षणाखाली प्रथम मुझफ्फरजंग व त्याच्या मृत्युनंतर निजामाचा तिसरा मुलगा सालाबतजंग हैद्राबादचे नवाब बनले. त्यासाठी फ्रें चांनी नवाबाकडून कृष्णा व गोदावरी खोऱ्यातील सर्व सुपीक प्रदेश ताब्यात घेतला.


- इंग्रजांच्या मदतीने महंमद अलीने चंदासाहेबचा पराभव करुन तो अर्काटचा नवाब बनला.
- १७५५ च्या सुमारास युरोपात इंग्रज व फ्रेंच यांच्यात शांतता प्रस्थापित झाल्याने भारतातही युध्द थांबले.



## पाँडीचेरीचा तह (१७५५)

- या तहानुसार भारतीय सत्ताधीशांच्या अंतर्गत भांडणात हस्तक्षेप न करण्याचे ब्रिटिश व फ्रेंचांनी कबुल केले.
- अशा तऱ्हेने परस्परांचे जिंकलेले सर्व प्रदेश परत करण्यात आले.
- परस्परांच्या वखारींना व व्यापारी केंद्रांना उपद्रव न करण्याचे आश्वासन देण्यात आले.

➢ **तिसरे कर्नाटक युध्द (१७५६-६३) :**



- १७५६ ला युरोपात सुरु झालेल्या सप्तवार्षिक युध्दाचा भारतातील परिणाम म्हणजे तिसरे कर्नाटक युध्द होते. १७५८ मध्ये फ्रें चांचा अधिकारी काऊंट-द-लाली याची भारतात नियुक्ती झाली. याच दरम्यान इंग्रजांनी प्लासीची लढाई जिंकून बंगालमधील आपली सत्ता अधिक मजबूत केली होती.
- ब्रिटिशांचे वाढते वर्चस्व पाहून हैद्राबादचा नवाब सालाबतजंग यांनी फ्रेंचांशी संबंध तोडले आणि ब्रिटिशांना शरण गेला.
- कांऊट लॅलीने १७५८ ला पाँडेचेरी जवळील सेंड डेविडचा किल्ला जिंकला आणि मद्रासला वेढा दिला. परंतू इंग्रजापुढे त्याचा निभाव न लागल्याने फ्रेंचांना पराभव स्वीकारावा लागला.
- वाँदीवॉशची लढाई – २२ जानेवारी १७६० रोजी ब्रिटिश सेनापती आयर कुट यांनी फ्रेंचाचा पुर्णत: पराभव करुन पाँडेचेरी जिंकले. त्यावेळी भारतातील फ्रेंचाचा गव्हर्नर जनरल 'काऊंट-द-लाली' होता.
- या लढाईचे नेतृत्व त्याने केले होते. तर इंग्रजांकडून सर आयर कूट या सेनानीने केले होते. वाँदीवॉशच्या लढाईनंतरच फ्रेंच सत्ता भारतात संपुष्टात आली.


By the KING.
A PROCLAMATION,
GEORGE R.
God Save

## पॅरिसचा तह :- (१७६३)

- पॅरिसच्या तहानुसार इंग्रज फ्रेंच सत्ता संघर्ष संपुष्ठात आला. भारतातील सत्तेच्या स्पर्धेत आता फ्रेंच राहीले नाही.
- पॅरिसच्या तहाने युरोपातील सप्तवार्षिक युध्द थांबले. परिणामी भारतातील हे युध्द थांबले.
- या तहानुसार पाँडीचेरी व काही प्रदेश फ्रेंचांना परत मिळाला.

| कालावधी | तह/महत्त्वाच्या घटना |
|---|---|
| **पहिले (१७४६-४८)** | ➢ ऑस्ट्रियातील वारसा युध्दाचा परिणाम<br>➢ एक्स ला चॅपेलचा तह |
| **दुसरे (१७४८-५४)** | ➢ भारतातील सत्ताधीशांमधील वारसा युध्द<br>➢ पाँडीचेरीचा तह |
| **तिसरे (१७५६-६३)** | ➢ युरोपातील सप्तवार्षिक युध्दाचा परिणाम वाँदीवॉशची लढाई<br>➢ पॅरीसचा तह |

### ❖ फ्रेंचांच्या पराभवाची कारणे व इंग्रजांच्या (ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या) विजयाची कारणे -

१. फ्रेंच लोकांची मुख्य सत्ता पाँडिचेरी येथेच होती. तेथून त्यांची सर्व सूत्रे हलविली जात. हा एक मोठा दोष होता. पाँडिचेरी इंग्रजांनी जिंकताच फ्रेंचांना शरण जाण्याशिवाय पर्याय नव्हता.
२. फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीपेक्षा ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची आर्थिक स्थिती फार चांगली होती. व्यापाराकडे त्यांचे कधीच दुर्लक्ष नव्हते. एवढेच नव्हे तर फ्रेंचांशी युद्ध सुरु असतानाही त्यांनी व्यापाराकडे दुर्लक्ष होऊ दिले नाही. कंपनीला नेहमीच पैसा अपुरा पडे.
३. फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी ही फ्रेंच सरकारच्या नियंत्रणाखाली काम करीत होती. त्यामुळे कंपनीच्या संचालकांना ठरावीक नफा मिळत असे. कंपनीच्या धोरणाविषयीचे निर्णय फ्रेंच सरकारच घेत असे. त्यामुळे संचालकांनी कामकाजात फारसा रस नसे. याउलट ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला ब्रिटिश सरकारने व्यापारविषयक पूर्ण अधिकार दिले होते. व्यापारवृद्धीवरच संचालकांना अधिकाधिक नफा मिळे. त्यामुळे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे संचालक भारतातील कारभाराविषयी जागरुक होते.
४. फ्रान्समध्ये १४ व लुई याची अत्यंत भ्रष्ट, अकार्यक्षम व अनियंत्रित राजवट सुरु होती. 'माझ्यानंतर प्रलय' असे तो म्हणे. तो स्वत: कर्तुत्वशून्य, चैनी व विलासी होता. तेव्हा अशा या राजाकडून परदेशांबरोबरचे व्यापारी संबंध समृद्ध होणे किंवा व्यापाराच्या माध्यमातून भारतासारख्या दूरवरच्या देशात सत्ता मिळवणे अशक्यप्राय होते.
५. इंग्लंडचे आरमार हे १८ व्या शतकातील जगातील एक उत्कृष्ट आरमार होते. त्यामानाने फ्रेंचांचे नाविक दल दुय्यम होते. ब्रिटिशांच्या नाविक शक्तीसमोर फ्रेंचांचा निभाव लागला नाही.
६. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी पराक्रमी, मुत्सद्दी, प्रामाणिक व स्वदेशनिष्ठ होते. भारतात ब्रिटिशांचे राज्य असावे असी त्याची मनोभूमिका होती.
७. फ्रान्स या राष्ट्राचा ओढा युरोपियन राजकारणाकडे होता. साम्राज्यविस्तारासाठी फ्रान्स, बेल्जियम, इटाली व जर्मनी या देशात प्रयत्न करीत होता. त्यामुळे फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीला त्या त्या सरकारकडून योग्य ती मदत मिळाली नाही.
८. फ्रेंच अधिकारी (भारतातील फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीचे) हे आपसांत भांडत त्यामुळे त्यांच्यात ऐक्य नव्हते. शौर्य, साहस, कार्यक्षमता याबाबतीत इंग्रज अधिकारी फ्रेंच अधिकाऱ्याच्या तुलनेने कित्येक बाबतीत श्रेष्ठ होते.
९. फ्रेंच सेनापती डुप्ले यास ऐन वेळी हिंदूस्थानातून परत बोलावल्यामुळे फ्रेंचांचे फार नुकसान झाले.
१०.फ्रेंचांकडे डुप्ले हा एक चांगला मुत्सद्दी होता; परंतु इंग्लंडशी तुलना करता फ्रेंचांजवळ कमी मुत्सद्दी होते व सेनापतीही कसलेले नव्हते. डुप्ले हा शेवटी कंपनीचा नोकर होता. कंपनीचा मुख्य उद्योग व्यापार होता. प्रदेश विस्तार नव्हे. प्रदेश विस्तारासाठी सैन्यदलाची उभारणी व फ्रान्समधील राज्यकर्त्यांचे जे सहकार्य हवे होते ते त्यास मिळाले नाही.
११.ब्रिटिश वसाहतींना खुला व्यापार स्वातंत्र्य होते तसेच फ्रेंच वसाहतींना नव्हते. फ्रेंचांच्या वसाहती सरकारवर पूर्णपणे अवलंबून होत्या. फ्रेंच व्यापाऱ्यांना सरकारने आखलेल्या रेषेबाहेर जाता येत नसे. याचा परिणाम शेवटी भारतातील फ्रेंचांच्या पाडावात झाला.
१२.फ्रान्स किंवा फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीकडे साधनांची कमतरता होती. त्यांना सैन्याचा पगार देणेही कठीण झाले होते. फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी ही फ्रान्सला एक बोजा झाली होती. फ्रेंच कंपनी कर्जबाजारी झाली होती. याउलट स्थिती ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची होती.

# इंग्रज आणि मराठे सत्तासंघर्ष (१७७५ – १८१८)

## ❖पहिल्या इंग्रज – मराठा युद्धाची पार्श्वभूमी



- ऑक्टोबर १७७३ मध्ये रघुनाथराव (राघोबा) पेशव्याने स्वत:ला पेशवा म्हणून घोषित केले; परंतु त्याचा हा निर्णय मराठा सरदारांना आवडला नाही म्हणून मराठा सरदारांनी त्यास पेशवेपदावरुन काढण्यासाठी जे कारस्थान रचले ते 'बारभाईचे कारस्थान' म्हणून ओळखले जाते. नारायणराव पेशव्यांची विधवा पत्नी ही यावेळी गरोदर होती. तिला जर पुत्र झाला तर त्याच्या नावाने कारभार करण्याचे बारभाईंनी ठरवले होते.
- पुण्यातील आपले वर्चस्व कायम राहावे यासाठी त्याने 'पेशवा' या नात्याने निजाम व हैदरशी मैत्रीकरार केले. माधवरावाने जिंकलेला सर्व प्रदेश हैदरला ६ लक्ष रु. खंडणी देण्याच्या मोबदल्यात देऊन राघोबाने त्याचे समर्थन मिळवले होते.
- नागपूरच्या राज्याबाबत रघुनाथराव हे मुधोजीचे समर्थक होते. (नारायणराव पेशव्यांनी नागपूरचे राज्य सावाजी भोसले यांना दिल्याचे जाहीर केले होते. मुधोजी हा सावाजीचा भाऊ होता.)
- १८ नोव्हेंबर १७७३ रोजी रघुनाथरावाने निजामअलीची भेट घेऊन २० लाखांचा प्रदेश व औरंगाबाद शहर त्यास देऊन त्याच्याकडून सावाजीला मदत न करण्याचे आश्वासन मिळवले होते. कारण सावाजी व निजामअली यांच्या फौजा पुण्याकडे चालून येत आहेत हे त्यास समजले होते.
- रघुनाथराव पुण्याकडे येत आहेत हे पाहून हरिपंत फडके, त्र्यंबकराव पेठे वगैरेंनी त्याचा पाठलाग करुन त्यास पुण्यास येऊ दिले नाही. दरम्यान, १८ एप्रिल १७७४ रोजी नारायणराव पेशव्याची विधवा बायको गंगाबाईला पुत्र झाला. त्याचे नाव सवाई माधवराव ठेवण्यात आले.
- २८ मे १७७४ ला या ४० दिवसांच्या मुलास पेशवेपदाची वस्त्रे देऊन सखारामबापू व नाना फडणवीस यांनी कारभार सुरु केला. त्यामुळे रघुनाथराव फारच दु:खी झाला. शिंदे होळकर व गोविंदराव गायकवाड यापैकी कोणीच आपल्या मदतीस येत नाहीत हे पाहून त्याने इंग्रजांशी संपर्क साधला. इंग्रज या संधीची वाटच पाहत होते. ती संधी राघोबांनी इंग्रजांना प्राप्त करुन दिली. सुरतच्या इंग्रजांनी राघोबाला आश्रय दिला.

### ➢ सुरतचा तह – ६ मार्च १७७५

- नारायणराव पेशव्याच्या दरबारात इंग्रज वकील मॉस्टिन याच्याशी रघुनाथरावाचा परिचय होताच. मॉस्टिन यास पुणे दरबारातील कटकारस्थानांची संपूर्ण माहिती होतीच. राघोबा सुरत येथे आश्रयास गेल्यावर साष्टी, वसई, ठाणे आदी मुंबईलगतचे प्रदेश मिळवण्यासाठी इंग्रजांनी त्याच्याशी वाटाघाटी सुरु केल्या. २० डिसेंबर १७७४ राजी ठाण्याचा किल्ला ब्रिटिश फौजेने जिंकला. रॉबर्ट गॉर्डन याच्या अधिपत्याखाली ही मोहिम हाती घेण्यात आली होती.
- राघोबाच्या संघर्षात पुणे दरबाराने याप्रकरणी फारसे लक्ष घातले नाही. इंग्रजांनी कारंजा, उरण इत्यादी ठाण्याजवळचा प्रदेश जिंकून साष्टी बेट आपल्या ताब्यात घेतले. रघुनाथरावाने इंग्रजांचा आश्रय घेतल्यामुळे मराठे अडचणीत आले होते.
- मॉस्टिन, रॉबर्ट गॅबियर या इंग्रज अधिकाऱ्यांनी रघुनाथरावाशी वाटाघाटी केल्या व त्यांच्यावर 'सुरतचा तह' लादला (इ.स. १७७५). हा तह करताना रघुनाथराव हेच पेशवेपदाचे खरे वारस आहेत. पुण्याचे कारभारी कोणा नकली मुलाच्या नावाने सत्ता बळकावून बसले आहेत अशी भूमिका ब्रिटिशांनी घेतली होती.

**सुरतच्या तहात पुढील कलमे होती**

१) इंग्रजांनी रघुनाथरावास पेशवेपदावर बसवावे. त्यासाठी २५०० सैन्य, पुरेसा दारुगोळा व तोफखाना यांनी मदत द्यावी.
२) या सैन्याच्या खर्चासाठी रघुनाथरावाने दरमहा दीड लक्ष रु. अग्रीम म्हणून द्यावेत.
३) अनामत म्हणून ६ लक्ष रु. रघुनाथरावाने इंग्रजांना रोख द्यावेत किंवा तेवढयाच रकमेचे जवाहीर अनामत ठेवावे.
४) ठाणे, वसई, साष्टी हे भाग तसेच सुरतजवळील दोन तालुके हा १९ लक्ष रु. उत्पन्नाचा मुलुख इंग्रजांना कायमचा द्यावा.

- पेशवेपदाच्या अनिवार इच्छेने रघुनाथरावाने स्वत:च्या वैयक्तिक स्वार्थ्यासाठी परकीय सत्तेची मदत घेतली. इंग्रजांना रघुनाथरावाबद्दल प्रेम वाटत नव्हते. मुंबई येथे ईस्ट इंडिया कंपनीला वखार स्थापन करावयाची होती. मुंबई बेट संपादून त्याची तटबंदी केली. पण मुंबई बंदरात येणारा कंपनीचा माल खुष्कीच्या बाजूने देशावर पाठविण्यासाठी ठाणे - साष्टी हाच मुख्य मार्ग होता. त्यापुढे डोंगर व घाट लागतात व तेथून मराठयांचा मूलूख सुरु होतो म्हणून इंग्रजांनी साष्टी घेतली होती.
- वसईपासून सुरतेपर्यंतची ठाणीही त्यांना महत्त्वाची वाटत होती. राघोबाकडून जो प्रदेश मिळाला त्या मुलखात जहाजासाठ लागणारे लाकूड मोठया प्रमाणात उपलब्ध होते. या सर्व फायद्यांचा विचार करता 'पेशव्यांचे भांडण लावून देव आम्हाला नवस न करता पावला!' हे इंग्रजांचे उद्‌गार लक्षवेधी आहेत

## ➢ पहिले इंग्रज – मराठा युद्ध – वाटचाल (इ.स. १७७५ - ८२) :

- सुरतच्या तहानुसार कर्नल कटिंग रघुनाथरावास बरोबर घेऊन पुण्याकडे निघाले. राघोबाचे व इंग्रजांचे मिळून ५०,००० सैन्य होते. त्यांच्यात व हरिपंत फडके यांच्या हाताखालील पुणे दरबाराची फौज यांच्यात आडास या गावी युद्ध झाले. युद्धात दोन्ही बाजूंचे खूप नुकसान झाले: पण निर्णायक निकाल लागला नाही. दरम्यान, पावसाळा सुरु झाल्याने कटिंग व रोघाबाच्या फौजेने हरितपंत फडकेच्या मागे न लागता डभई येथे पावसाळी छावणी टाकून राहण्याचा निर्णय घेतला.
- दरम्यान, इ.स. १७७३ मध्ये Regulating Act पास झाला. त्यानुसार बंगालचा गव्हर्नर वॉरन हेस्टिंग्ज हा मुंबई, मद्रास व बंगाल या तीन प्रांताचा गव्हर्नर जनरल झाला. त्या कायद्यानुसार भारतीय सत्तांशी युद्ध किंवा तह करण्याचा अधिकार हा गव्हर्नर जनरलला देण्यात आला व तो मुंबई व मद्रासच्या गव्हर्नरवर बंधनकारक ठरला. मुंबईच्या गव्हर्नरने गव्हर्नर जनरलला देण्यात आला व तो मुंबई व मद्रासच्या गव्हर्नरवर बंधनकारक ठरला.
- मुंबईच्या गव्हर्नरने गव्हर्नर जनरलची परवानगी न घेता मराठयांशी युद्ध सुरु केल्याने वॉरन हेस्टिंग या ग.ज.ने मराठयांशी सुरु असलेले युद्ध बंद करण्याचा आदेश दिला व पुणे दरबाराशी तह करण्यासाठी कॅप्टन ॲप्टन यास पाठविले. पुण्यातील मुत्सद्यांशी अनेक दिवस वाटाघाटी करुन त्याने पुरंदर मुक्कामी खालील तह केला.

### पुरंदरचा तह : १ मार्च १७७६

१) साष्टी व ठाणे इंग्रजांकडे राहतील.
२) रघुनाथरावासाठी झालेल्या खर्चाबद्दल १२ लक्ष रु. मराठयांनी इंग्रजांना द्यावेत.
३) रघुनाथरावाला पुणे दरबाराने वार्षिक ३ लक्ष रु. पेन्शन द्यावी व त्याने राजकारण संन्यास घ्यावा.
४) इंग्रजांनी गुजरातमधील जिंकलेला मराठयांचा प्रदेश इंग्रजांकडेच राहावा.
५) रघुनाथरावाला इंग्रजांनी पुणे दरबाराच्या स्वाधीन करावे.
६) गोविंदराव गायकवाडास इंग्रजांनी मदत न करता फत्तेसिंह गायकवाड यास करावी.

- वॉरन हेस्टिंग्जने केलेला हा तह मुंबई प्रांताचा गव्हर्नर सर हॉर्नबी यास पसंत नव्हता. त्याने हा तह रद्द करुन पुणे दरबाराशी पुन्हा युद्ध चालू ठेवण्यासाठी कंपनीच्या संचालकांची परवानगी घेण्याचे प्रयत्न सुरु केले. तसेच रघुनाथरावाला मराठयांच्या स्वाधीन करण्याऐवजी मुंबई येथे आपल्याकडे ठेवून घेतले. पुणे दरबाराने पुरंदर तहानुसार रघुनाथरावास आपल्या स्वाधीन करावे अशी मागणी केली; पण त्याने त्यास दाद दिली नाही. त्यामुळे पुरंदरचा तह हा अर्थहीन ठरला. रघुनाथराव निराश झाला. कारण त्यास पुणे दरबाराच्या हवाली केले जात नव्हते. पेशवेपदही मिळत नव्हते व इंग्रज त्याची सुटकाही करत नव्हते. दरम्यान, एक सुखद घटना त्यांच्या जीवनात घडली ती म्हणजे त्यांची पत्नी आनंदीबाईने १० जानेवारी १७७५ ला माळव्यात धार येथे एका मुलास जन्म दिला हाच पुढे दुसरा बाजीराव पेशवा म्हणून सत्तेवर आला.
- पुरंदर तह इंग्रज व राघोबा यांना असमाधानकारक वाटत होता. कारण मराठयांना ६ लक्ष रुपयांच्या उत्पन्नाचा मुलूख गमवावा लागला होता तर इंग्रजांना ६ लक्ष रु. मुलूखापेक्षाही राघोबा ताब्यात राहणे अधिक फायद्याचे आहे असे वाटत होते. पुणे दरबाराने रघुनाथरावाची सुटका होईपर्यंत पुरंदरच्या तहाची अंमलबजावणी होणार नाही हे स्पष्ट केले. इकडे फ्रेंचांनी इंग्रजांविरुद्ध मराठयांना मदत करण्याची भुमिका स्पष्ट केली; परंतु वॉरन हेस्टिंग्जने पुणे दरबाराने फ्रेंचांची मदत घेऊ नये हे त्यांना समजावून सांगितले.

## ➢ तळेगावची लढाई – वडगावचा तह (१६ जानेवारी १७७९) :

- इ.स. १७७६ मध्ये अमेरिकन वसाहतींनी इंग्लंडविरुद्ध स्वातंत्र्ययुद्ध पुकारले. अमेरिकन वसाहती ब्रिटिशांच्या वसाहतवादातून मुक्त झाल्या. ते नुकसान भरुन काढण्यासाठी मराठयांशी पुन्हा युद्ध करण्याचा आदेश इंग्लंडने दिला. तो वॉरन हेस्टिंग्जला कळवण्यात आला.
- हेस्टिंग्जने मुंबईच्या गव्हर्नरला मराठयांची पश्चिम किनाऱ्यावरची महत्त्वाची ठाणी जिंकून घेण्याचा व रघुनाथरावास पेशवेपद द्यावे असा आदेश दिला. संकल्पित युद्धात मराठयांच्या विरुद्ध लढण्यासाठी कलकत्ता व मद्रास येथून सैन्य व युद्धसाहित्याची मदत पाठविली.
- कर्नल इगरटनच्या नेतृत्वाखाली रघुनाथरावास सोबत घेऊन हे लष्कर पुण्याकडे निघाले; परंतु मराठयांच्या लष्कराने गनिमी काव्याचा आश्रय घेऊन ब्रिटिश फौजेला 'सळो की पळो' करुन सोडले. बोरघाटपासून पनवेलपर्यंत मराठयांचे सैन्य पसरलेले होते. त्यांनी ब्रिटीश सैनिकांचा मुंबईशी असलेला संपर्क तोडला.
- इंग्रजी फौजेची अन्नपाण्यावाचून उपासमार होऊ लागली. इंग्रज सैन्य हैराण झाले. त्यांना शरण येण्याशिवाय पर्याय नव्हता. कारण जानेवारी १७७९ मध्ये ५०,००० फौज घेऊन नाना फडणवीस, बापू गोखले, महादजी शिंदे वडगावजवळ एका टेकडीवर मुक्काम ठोकून होते. शेवटी इंग्रजांनी तहाच्या वाटाघाटी सुरु केल्या.
- एका अर्थाने तहाच्या वाटाघाटीत मराठे वरचढ राहिले व त्यांनीच इंग्रजांवर पुढील अटी लादल्या. हा तह 'वडगावचा तह' म्हणून प्रसिद्ध आहे. त्यातील तरतुदी –

### वडगावचा तहातील तरतुदी

१) इंग्रजांनी राघोबास ताबडतोब मराठयांच्या स्वाधीन करावे.
२) साष्टी, ठाणे व गुजरातमधील सर्व मुलुख इंग्रजांनी मराठयांना परत द्यावा.
३) रघुनाथराव व इंग्रज यांच्यातील सर्व करार रद्द समजावेत.
४) बंगालमधून निघालेल्या गॉडर्डच्या फौजांना परत बोलावून घ्यावे.
५) या तहाच्या प्रामाणिक अंमलबजावणीसाठी दोन इंग्रज अधिकारी मराठयांकडे ओलीस ठेवावेत.

- या तहानुसार १८ जानेवारी १७७९ रोजी इंग्रजांनी रघुनाथरावास मराठयांच्या स्वाधीन केले. त्याने राजकारण संन्यास घोषित केला व उर्वरित आयुष्य झांशी येथे व्यतीत करण्याचे ठरविले. त्याला वार्षिक बारा लाखांची जहागीर देण्याचे ठरले होते. वास्तविक वडगावच्या तहावर इंग्रज अधिकारी फार्मर याने सहीशिक्का केला होता तरीही हा तह करण्याचा कोणताही अधिकार त्यास मुंबई कौन्सिलने दिला नव्हता. त्यामुळे तो तह बेकायदेशीर आहे अशी भूमिका इंग्रजांनी घेतली. वडगावहून ब्रिटिशांचे लष्कर सुरक्षितपणे मुंबईस पोहोचले होते.
- महादजी शिंदे याचा सेनापती हरी बाबाजी यांच्याबरोबर रघुनाथराव झांशीकडे वाटचाल करीत असतानाच त्यास वडगावचा तह इंग्रजांनी फेटाळला असे समजले. तेव्हा तो हरी बाबाजी या सेनापतीच्या हातावर तुरी देऊन निसटला व सुरत येथे पुन्हा इंग्रजांच्या आश्रयाला गेला.
- इ.स. १७९५ मध्ये सवाई माधवराव पेशव्याचा अचानक मृत्यू झाला. तो निपुत्रिक असल्याने पेशव्याच्या गादीचा वारस शोधण्याचा प्रश्न निर्माण झाला. शेवटी रघुनाथरावाचे पुत्र दुसरा बाजीराव यास ५ डिसेंबर १७९६ रोजी पेशवेपद दिले गेले.

### ➢ ब्रिटिशविरोधी - अखिल भारतीय राज्यसंघ (१७७९) –

- अडचणीत आले की इंग्रज तह करतात व नंतर हात झटकतात हे लक्षात आल्याने असंतुष्ट राजे / सत्ताधीश यांनी ब्रिटिशांविरोधी आघाडी बांधली. त्यात पुढील शक्ती / राजे होते.
  १) पेशवे, २) नागपुरचे भोसले, ३) निजाम, ४) हैदर अली, ५) दिल्ली सम्राट, ६) अवधचा नवाब, ७) फ्रेंच, पोर्तुगीज, डच, ८) जंजिऱ्याचा सिद्दी, ९) फत्तेसिंह गायकवाड
- या संघातील चार महत्त्वाच्या सत्तांकडे विशिष्ट कामगिरी सोपविली होती. उदा. पेशव्यांकडे मुंबई व गुजरात आघाडी सांभाळण्याचे काम देण्यात आले, तर हैदर अलीकडे मद्रास आघाडी, भोसले यांच्याकडे बंगालची आघाडी, तर निजामाने पूर्व किनाऱ्यावर लक्ष ठेवावे असे ठरले. परंतु या आघाडीची माहिती मिळताच ब्रिटिश सावध झाले व त्यांनी ही आघाडी फोडण्याचा प्रयत्न सुरु केला. त्यांनी निजामाला गुंटुर जिल्हा परत केला. भोसल्यांना आपल्या बाजूस वळवण्यात ब्रिटिशांना यश आले. त्यासाठी नागपूरकर भोसल्यास ब्रिटिशांनी ५० लक्ष रुपये दिले. गुजरातमध्ये फत्तेसिंह गायकवाडांनाही आपल्या बाजूस वळवण्यात ब्रिटिशांना यश आले; परंतु हैदर अलीने मात्र दक्षिणेत ब्रिटिशांशी सतत युद्ध चालू ठेवले व दक्षिण भारतावर वर्चस्व प्रस्थापित केले.

### ➢ सालबाईचा तह –

- पुढे इंग्रज – मराठे यांच्यात अनेक दिवस वाटाघाटी होऊन ग्वाल्हेरपासून २० मैल अंतरावर सालबाई येथे इंग्रज – मराठे यांच्यात तह झाला. ६ जून १७८२ ला वॉरन हेस्टिंग्ज व २४ फेब्रुवारी १७८३ ला नाना फडणविसांनी या तहावर सही केली होती.

### सालबाईचा तहातील तरतुदी

१) पुरंदराच्या तहापासून इंग्रजांनी वसई धरुन जो मुलूख जिंकला होता तो ते मराठयांना परत करतील.
२) साष्टी, मुंबईच्या आसपासची बेटे व भडोच शहर इंग्रजांच्या ताब्यात राहील.
३) गुजरातमध्ये मराठे व गायकवाड यांचा जिंकलेला प्रदेश इंग्रज मराठयांना परत करतील.
४) यापुढे इंग्रज रघुनाथरावांना कोणतीच मदत करणार नाहीत.
५) रघुनाथरावांनी आपल्या राहण्यासाठी एखादे ठिकाण निवडावे व पेशव्यांनी रघुनाथरावांना दरमहा २५,००० रु. पेन्शन द्यावी.
६) हैदरअलीने जो प्रदेश जिंकून घेतला तो त्यांना परत देण्यासाठी पेशव्याने प्रयत्न करावेत.
७) इंग्रजांचे शत्रू आणि मित्र तेच मराठयांचे शत्रू – मित्र राहतील.
८) पेशव्यांनी इंग्रजांशिवाय अन्य कोणाही युरोपियन लोकांचे सहकार्य घेऊ नये.
९) पेशव्यांनी इंग्रजांना व्यापारी सवलती पूर्वीप्रमाणेच द्याव्यात.
१०) युद्ध सुरु होण्यापूर्वी फत्तेसिंह गायकवाड यांच्याकडे जो मुलूख होता तो त्यांच्याकडे कायम ठेवावा व गायकवाडांनी मराठी राज्यांची सेवा पूर्वीप्रमाणे करावी.
११) रघुनाथरावांनी इंग्रजांना जो प्रदेश दिला होता तो प्रदेश इंग्रजांनी मराठयांना परत करावा.
१२) या कराराचे पालन होते की नाही हे पाहण्यासाठी महाराजा माधवराव शिंदे यांची मध्यस्थ म्हणून नेमणूक करावी.

- या तहाचे परिणाम इंग्रज व मराठे या दोघांनाही काही प्रमाणात झाले. या तहामुळे नाना फडणवीसाची कूटनीती किती श्रेष्ठ होती हे दिसून येते. रघुनाथरावाला हाताशी धरुन मराठयांच्या राज्यकारभारात हस्तक्षेप करणे व रघुनाथरावाशी तह करुन मराठयांचे प्रदेश मिळवणे हा उद्योग इंग्रज करत होते. त्या गोष्टीस या तहामुळे पायबंद बसला.
- डॉ. शांतीप्रसाद वर्मांच्या मते, 'नाना फडणवीस व महादजी शिंदे यांच्या कामगिरीमुळेच सालबाईचा तह घडून आला. या दोघांनी मराठी राज्याचे संरक्षण केले.' या तहामुळे ९ वर्षापासून सुरु असलेल्या इंग्रज – मराठा युद्धाचा शेवट होऊन शांतता प्रस्थापित झाली. ब्रिटिशांच्या विरोधी नाना फडणवीसाने उभारलेली अखिल भारतीय फळी हे नाना फडणवीसाच्या राजनीतीचे एक मोठे यशच होय. हैदरअलीशी सल्लामसलत न करता हा तह इंग्रजांशी मराठयांशी घडवून आणल्यामुळे तो नाराज झाला. त्यामुळे मराठे व हैदर यांच्यात कटू भावना निर्माण झाली. हा या तहाचा एक मोठा वाईट परिणाम होय.

### ➢ पुणे दरबारी इंग्रज वकिलांची नियुक्ती –

- इ.स. १७८३ च्या सालबाईच्या तहापासून इंग्रज – मराठे संबंधात एक नवे पर्व सुरु झाले. इंग्रजांचा वकील पुणे दरबारात वावरु लागला. इ.स. १७८६ – १८१८ च्या मराठयांच्या ऱ्हासाच्या काळात पुणे दरबारात चार वकील वास्तव्याला होते.
  १) सर चार्लस मॅलेट (इ.स. १७८६ – १७९७)
  २) कर्नल विल्यम पामर (इ.स. १७९८ – १८०१)
  ३) सर बॅरी क्लोज (इ.स. १८०१ – १८१०)
  ४) माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन (इ.स. १८११ – १८१९) हा भारतात एकूण ३२ वर्षे होता.
- इंग्रजांचा वकील पुण्याच्या दरबारी असावा ही मागणी प्रथम नाना फडणवीसांनी केली. याचे कारण म्हणजे सालबाईच्या तहापासून मराठयांचा प्रमुख प्रवक्ता म्हणून महादजीचे महत्त्व वाढीस लागले होते. ते नानास पसंत नव्हते. ही मागणी म्हणजे नाना फडणवीसांची ही मोठी चूक होती.
- मराठयांच्या अंतर्गत राजकारणात लक्ष घालण्याची संधीच ब्रिटिशांना मिळाली. मराठे परस्परांविरुद्ध कशी कारस्थाने करतात व आपण त्याचा लाभ कसा उठवावयाचा हे चाणाक्ष ब्रिटिशांनी हेरले. वरील चारही वकिलांचा पत्रव्यवहार भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे. इंग्रज – मराठा संबंधाचा अभ्यास करण्यासाठी ते प्रथम, अस्सल साधन समजले जाते.

## ❖ दुसरे इंग्रज – मराठा युद्ध (इ.स. १८०२ – इ.स.१८०३) पार्श्वभूमी –



- ४ डिसेंबर १७९६ रोजी दुसरा बाजीराव हा पेशवेपदावर आला. त्यास पेशवेपदावर बसविण्यासाठी नाना फडणवीसांनी मराठयांचे अनेक शत्रु व मित्र यांचे सहकार्य घेतले. त्यासाठी त्यांनी महाड येथून सूत्रे हलवली होती. ही घटना 'महाडचे कारस्थान' म्हणून प्रसिद्ध आहे. दुसरा बाजीराव हा स्वभावाने हेकेखोर, दुसऱ्याच्या मताप्रमाणे चालणारा, वृत्तीने चंचल, कर्तृत्वशून्य व स्त्रीलंपट होता. विवाहित स्त्रियांशी संबंध ठेवणे व नंतर तिच्या पतीला बढती देणे अशी कामे तो करी.

### ➢ होळकर घराण्यातील वारसाचा प्रश्न –

- पेशवा या नात्याने दुसऱ्या बाजीरावाने सर्व मराठा सरदारांना समानतेने वागवणे आवश्यक होते. पण प्रत्यक्षात तसे काही झाले नाही. तुकोजी होळकर हे इ.स. १७९७ मध्ये मृत्यू पावले. त्यास काशीराव व मल्हारराव हे दोन औरस पुत्र व विठोजी व यशवंतराव हे दोन दासीपुत्र होते. काशीराव हा वेडा असल्याने त्यास होळकरांचा वारस म्हणून मान्यता देऊ नये असे इतर भावांना वाटत होते.
- याच वेळी दौलतराव शिंदे यांनी पुण्यात मल्हारराव होळकर (दुसरा) यांच्यावर अचानक हल्ला करुन मल्हाररावसकट त्याची सर्व छावणी आपल्या हस्तकांमार्फत कापुन काढली. (शिंदे - होळकर या दोन घराण्यांत पिढयानपिढया वैर सुरु होते दोन्ही घराणी एकमेकांचे पाय ओढीत होती. दौलतराव शिंदेंनी अकार्यक्षम व वेडा असलेला काशीराव यास होळकरांचा वारस नेमावे असा आग्रह पेशव्यांकडे धरला होता.) मल्हाररावाचे बंधू असलेले विठोजी व यशवंतराव हे मात्र त्या हल्ल्यातून निसटले व त्यांनी दौलतराव शिंदे व बाजीराव दुसरा या दोघांचा सूड घेण्याची शपथ घेतली.

### ➢ यशवंतराव होळकरांचा उदय–

- यशवंतराव होळकरांनी इ.स. १७९७ – ९८ या दोन वर्षांच्या काळात फौज जमवली, पैसा मिळवला; अनुयायी मिळवले. इ.स. १७९७ च्या शेवटी तो नागपूरच्या भोसलेंकडे गेला व त्याच्या मदतीची मागणी केली. परंतु दौलतराव शिंदे व दुसरा बाजीरावाने नागपूरकर भोसल्यास कळवले की, त्यांनी यशवंतराव होळकरास आश्रय देऊ नये. नसता आम्ही भोसल्यांचा सूड घेऊ. भोसल्यांनी यशवंतराव होळकरास तुरुंगास टाकले, परंतु तेथून तो निसटला. यशवंतराव होळकरांनी भिल्ल साथी मिळवले तसेच शिंद्यांच्या ताब्यात असलेल्या प्रदेशात (माळवा) लुटालुट चालविली. महेश्वर याठिकाणी हल्ला करुन जडजवाहीर मिळवले.

## ➢ विठोजी होळकरांचा वध –

- दरम्यान, विठोजी होळकर यानेही फौजफाटा जमवून लुटालुट सुरु केली होती. बाजीराव दुसरा याने विठोजीचे पारिपत्य करण्याचे ठरविले. पण त्यात त्याला अपयश आल्याने बापू गोखले. या आपल्या सेनापतीच्या साहाय्याने विठोजी होळकरास पुण्यात आणण्यात आले व १६ एप्रिल १८०१ या दिवशी विठोजी होळकरला हत्तीच्या पायाखाली देऊन ठार केले.
- वासुदेवशास्त्री खरे यांनी म्हटले, 'अत्यंत नीच दर्जाचा खुनशी सूड!' विठोजी होळकराचा ज्या पद्धतीने दुसऱ्या बाजीरावने खून घडवून आणला त्यामुळे यशवंत होळकरांना पेशव्यांचा सूड घेण्याची शपथ घेतली. विठोजी होळकरला हत्तीच्या पायाखाली दिले. त्याचा मृत्यू त्याने आनंदाने पाहिला. त्याचा मृतदेह पुणेकरांच्या दर्शनासाठी २४ तास ठेवला. त्याने इ.स. १८०१ मध्ये मध्य हिंदूस्थानात शिंद्यांच्या प्रदेशावर हल्ले करुन लूट मिळवली.
- माळव्याच्या या मोहिमेत यशवंतराव होळकरला श्यामराव महाडिक, फत्तेसिंह माने, जिवाजी यशवंत, अमीरखान, भवानीशंकर बक्षी व काही पेंढारी सरदार मिळाले. यशवंतराव होळकराला आता खूपच प्रसिद्धी व किर्ती मिळाली.
- यशवंतराव होळकरांच्या वतीने पाराशर दादाजी व अहिल्याबाईचा ज्येष्ठ विश्वासू सरदार गोविंदपंत गानू यांनी बाजीराव दुसरा याच्यापुढे होळकर घराण्यास न्याय द्यावा अशी विनंती केली होती परंतु उपयोग झाला नाही. (मृत मल्हाररावचा मुलगा खंडेराव व त्याची आई दौलतराव शिंद्यांच्या अटकेत होती व दुसऱ्या बाजीरावाने दौलतराव शिंद्यास सांगून त्या दोघांची सुटका करावी अशी मागणी यशवंतराव होळकरांनी वारंवार केली. पण पेशव्यांचा मुख्य कारभारी बाळाजी कुंजर यांनी यशवंतराव होळकरांच्या या मागणीकडे दुर्लक्ष करण्याचा सल्ला दिला होता. त्यामुळे यशवंतराव होळकर चिडले.)

## ➢ यशवंतराव होळकरांची पुण्यावर स्वारी (इ.स. १८०२) –

- दुसरा बाजीराव वारंवार विनंती करुनही दाद देत नाही म्हणून यशवंतराव होळकरांनी पुण्यावरच आक्रमण करण्याचे ठरविले. आता बाजीराव दुसऱ्याच्या पुढे प्रश्न पडला की, होळकरांची बाजू घ्यावी की शिंद्यांची? यशवंतराव होळकरांचे आक्रमण होणार या भीतीपोटी खुद्द पेशव्याने आपले जडजवाहीर सिंहगडला नेऊन ठेवले व स्वत: रायगडावर जाण्याची तयारी दर्शविली. परंतु दुसऱ्या बाजीरावाचा मुख्य कारभारी बाळाजी कुंजर याने त्यांना प्रश्न विचारला, 'तुम्हीच जर राजधानीतून पळून गेलात तर शत्रूशी कोण लढेल?' दुसऱ्या बाजीरावने दौलतराव शिंदे यांना लष्कर घेऊन आपल्या मदतीस यावे असा निरोप पाठवला. तेव्हा दौलतराव शिंदे यांनी स्वत: येण्याचे टाळले; परंतु आपला विश्वासू सरदार सदाशिव भास्कर बक्षी यास निवडक सैन्यानिशी दुसऱ्या बाजीरावकडे मदतीस पाठवले. त्याच्या मदतीस दुसऱ्या बाजीरावाने ३ लक्ष रु. पाठवले होते.
- यशवंतराव होळकरांनी पेशवा बाजीराव दुसरा यास निरोप पाठविला का, 'तुम्ही या राज्याचे धनी आहात. तुमच्याविरुद्ध शस्त्र उभारण्याची माझी अजिबात इच्छा नाही. शिंदे - होळकर यांच्यातील भांडण आपण योग्य तो न्याय देऊन सोडवावे एवढीच माझी इच्छा आहे. मी शिंद्यांइतकाच तुमचा, मराठा राष्ट्राचा एकनिष्ठ सेवक आहे हे विसरु नका. माझा लढा फक्त शिंद्यांशी आहे. त्यात मला न्याय द्या म्हणजे माझी कसलीही तक्रार नाही.' यशवंतराव होळकरांच्या या निर्वाणीच्या निरोपावर दुसऱ्या बाजीराव पेशव्याने यशवंतराव होळकरांना भेटावे असा सल्ला मात्र त्यास कोणी दिला नाही. त्यावर फक्त चर्चाच होत राहिली. यशवंतराव होळकरांनी बाळाजी कुंजर यास भेटण्यास नकार दिला. त्यामुळे वाटाघाटीचे मार्ग बंद झाले.

## ➢ हडपसरचे युद्ध –

- २५ ऑक्टोबर १८०२ रोजी पुण्याजवळ हडपसर येथे यशवंतराव होळकर व पेशवे - शिंदे यांचे लष्कर यांच्यात युद्ध झाले. यशवंतराव होळकरांनी सकाळी दोन तास आपण वाट पाहू आणि शत्रूने हल्ला केल्यानंतरच आपण लढाईला प्रारंभ करु असे घोषित केले.
- पण प्रथम शिंद्यांच्या फौजांनीच होळकरांच्या फौजांवर हल्ला करण्यास प्रारंभ केला. परंतु यशवंतराव होळकरांच्या फौजेने शिंद्यांच्या व पेशव्यांच्या लष्कराचा पुर्णपणे पराभव केला. शिंद्यांचा सदर सदाशिव भास्कर बक्षी हा ६००० सैन्यासह मारला गेला. शिंद्यांच्या लष्कराने शरणागती पत्करली.
- होळकरांचे २००० सैन्य मारले गेले. या युद्धामुळे एक लढवय्या शूर सेनापती अशी त्याची प्रतिमा मराठेशाहीत निर्माण झाली. हडपसरच्या या युद्धात पराभूत झाल्यानंतर दुसरा बाजीराव त्याचा भाऊ चिमाजी अप्पासोबत वडगावला व तेथून पर्वतीवरुन सिंहगडच्या पायथ्याशी डोणजा येथे जाऊन राहिला. हडपसरच्या पराभवानंतर त्याने ६ महिने पुण्यात पाय ठेवला नाही. वसई येथे त्याचा या काळात मुक्काम होता. इंग्रजांच्या आश्रयाला तो गेला.
- दुसऱ्या बाजीरावास पकडणे यशवंतराव होळकरांना मुळीच अशक्य नव्हते. उलट दुसऱ्या बाजीरावाची उपासमार होऊ नये म्हणून त्याने धान्य पाठवले. बाजीराव दुसरा यांनी इंग्रजांची मदत घेऊ नये अशी त्यांना विनंती केली परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. बाजीराव दुसरा याने मुंबईच्या इंग्रज गव्हर्नरला पत्र पाठवून इंग्रजांकडे मदतीची मागणी केली. आपल्या मदतीस लष्कर द्यावे अशी विनंती केली. इंग्रज संधीची वाटच पाहत होते. अनेक दिवसांच्या वाटाघाटीनंतर ३१ डिसेंबर १८०२ रोजी वसईचा तह झाला.
- बाजीरावाने इंग्रजांना असे लिहून दिले की, चंद्रसूर्य आहेत तो पर्यंत हा करार कायम राहील. वसईचा हा तह म्हणजे मराठयांच्या इतिहासाला कलाटणी देणारी एक महत्त्वाची घटना होय. १८ मार्च १८०३ रोजी ग.ज. लॉर्ड वेलस्लीचे या तहावर शिक्कामोर्तब झाले.

## वसईच्या तहातील अटी

१. एकाचे शत्रू व मित्र हे दुसऱ्याचे (बाजीराव दुसरा व ब्रिटिश) मित्र मानले जावेत.
२. इंग्रज दुसऱ्या बाजीरावाच्या राज्याचे रक्षण करतील.
३. दुसऱ्या बाजीरावाच्या राज्याच्या रक्षणासाठी ६००० सैनिकांचे (युरोपियन) एक पथक ठेवले जाईल.
४. या सैन्याच्या खर्चासाठी दुसऱ्या बाजीरावाने २६ लक्ष वार्षिक उत्पन्नाचा मुलूख इंग्रजांना तोडून द्यावा.
५. दुसऱ्या बाजीरावाने इंग्रजांशिवाय इतर युरोपियन लोकांस नोकरीस ठेवू नये.
६. दुसरा बाजीराव व इंग्रज हे एकमेकांना लष्करी मदत करतील.
७. इंग्रजांच्या सल्ल्याशिवाय दुसरा बाजीराव कोणत्याही राज्याशी युद्ध करणार नाही.
८. गायकवाडांशी इंग्रजांनी जा तह केला आहे त्यास बाजीरावाने मान्यता द्यावी.
९. निजाम व बाजीराव यांच्यात भांडण झाल्यास इंग्रज देतील तो निर्णय मराठयांनी मान्य करावा.

### ➢ वसईच्या तहाचे परिणाम -



१. या तहामुळे मराठयांचे खरेखुरे स्वातंत्र्य संपुष्टात आले. इंग्रजांनी वसईच्या तहामुळे मराठयांना असे काही बांधून टाकले की, त्यातून सुटका होणे अशक्य होते.
२. या तहामुळे इंग्रतांचे (ईस्ट इंडिया कंपनी) वर्चस्व दक्षिण भारतात अप्रत्यक्षपणे प्रस्थापित झाले.
३. या तहामुळे मराठा सरदार मंडळाचा पुढारी व छत्रपतींचा पंतप्रधान जो पेशवा त्यांच्याशी कंपनीचे निश्चित संबंध प्रस्थापित झाले.
४. या तहानुसार दुसऱ्या बाजीरावला आपल्या बाह्य व अंतर्गत शत्रूंपासून संरक्षणाची हमी मिळाल्याने तो राज्यकारभाराविषयी उदासीन झाला आणि आपले जीवन भोगविलासात घालवू लागला. त्यास पैशांची कमतरता भासू लागली. तेव्हा पैसा मिळविण्यासाठी तो पुण्याच्या लोकांवर नाना तऱ्हेचे जुलुम व अत्याचार करु लागला.
५. हा तह म्हणजे ब्रिटिशांच्या कूटनीतीला आलेले पूर्ण यश होय. टिपू सुलतानाचे राज्य खालसा केल्यानंतर व निजामाने तैनाती फौज पद्धत स्वीकारल्यानंतर आता आपले खरे शत्रू मराठेच आहेत हे इंग्रजांना माहित होते. लॉर्ड वेलस्लीने वसई तहानुसार दुसऱ्या बाजीरावाला तैनाती फौजेच्या जाळ्यात अडकविले. हा तह म्हणजे मराठेशाहीच्या अस्ताची मृत्युघंटाच होय.
६. वसईचा तह हा दुसऱ्या इंग्रज – मराठा युद्धाला कारणीभूत ठरला. कारण दुसऱ्या बाजीरावने या तहावर सही केल्याची वार्ता समजताच पुढे काय करावयाचे याचा विचार करण्यासाठी सरदार मंडळी एकत्र आली. सर्वच मराठा सरदारांनी इंग्रजांशी लढावे की नाही याबाबत निर्णय घेण्यात विलंब लावला. परंतु वसईच्या तहामुळे आपणास धोका आहे हे त्यांना पटले व शेवटी इंग्रजांशी प्रतिकार करण्याचे त्यांनी ठरविले.
७. इंग्रजांशी युद्ध करणार की नाही हे दौलतराव शिंदे व नागपूरचे भोसले यांनी स्पष्ट केले नाही. मराठा सरदारांत त्याबाबत एकी होत नाही हे पाहून यशवंतराव होळकरांनी पुणे सोडण्याचा निर्णय घेतला. पण त्यापुर्वी त्यांनी पुण्यातील व्यापारी सावकार सरदारांना लुटले त्यामुळे 'पुणे लुटणारा' म्हणून लोक होळकरांना संबोधू लागले. यशवंतराव होळकरांनी ५० लक्ष रु. जमा केले होते.
८. लॉर्ड वेलस्ली हे दुसऱ्या बाजीरावाला घेऊन पुण्यात येत आहे हे पाहून यशवंतराव होळकर चिंचवडला गेला. अमृतराव (रघुनाथरावाचा दत्तक पुत्र) जुन्नरकडे निघून गेले. वेलस्लीने पेशवेपदावर दुसरा बाजीराव आला असून त्याचे रक्षण इंग्रज करणार आहेत असा अधिकृत जाहीरनामा काढला.

- अमृतराव, दौलतराव शिंदे, यशवंतराव होळकर हे एकमेकांशी प्रामाणिकपणे वागले असते व त्यांनी एकमेकांशी मनापासून सहकार्य केले असते तर मराठयांना इंग्रजांचा पराभव करता आला असता. इंग्रजांनी बाजीरावाला पेशवा केल्यामुळे अमृतराव अडचणीत आला. बाजीरावाच्या गैरहजेरीत पेशवेपदाची सूत्रे त्याच्या हाती होती.
- पुणे सोडताना त्याने स्वत:च्या मुलाकडे पेशवेपदाची सुत्रे दिली होती. अमृतरावला मराठा दरबारातून जी पेन्शन मिळत होती तीही बाजीरावाने बंद केली. आता पुढे काय करावे हा प्रश्न त्याच्या पुढे उभा राहिला. इंग्रजांनी मोठया युक्तीने अमृतरावला आपल्या बाजूस वळविले.
- वसईच्या तहास मराठा सरदारांनी मान्यता द्यावी असा ब्रिटिशांचा प्रयत्न होता. दौलतराव शिंदे यांनी स्पष्ट केले की, नागपूरकर भोसले, यशवंतराव होळकर यांची भेट झाल्याशिवाय व सविस्तर चर्चा झाल्याशिवाय आपण त्या तहावर सही करणार नाही. ब्रिटिशांनी वारंवार सांगूनही भोसले व शिंदे यांनी आपला निर्णय लवकर कळविला नाही. उलट दरम्यानच्या काळात शिंदे, होळकर व भोसले यांनी आपापसात पत्रव्यवहार चालू ठेवला. यशवंतराव होळकरांनी इंग्रजविरोधी युतीतून अंग काढून घेतले. कारण दौलतराव शिंदे यांनी बाजीरावाला लिहिलेल्या पत्रात म्हटले होते, 'यशवंतरावांनी ज्या ज्या मागण्या केलेल्या आहेत त्या त्या पूर्ण करण्याचा आपल्याला केवळ देखावा करावयाचा आहे. युद्ध संपल्यानंतर यशवंतरावाचा आपण पुरेपूर सूड घेऊ.' हे पत्र यशवंतराव होळकराच्या हाती पडेल अशी मुद्दामच व्यवस्था लॉर्ड वेलस्लीने केली होती. या पत्रामुळेच यशवंतराव होळकर सावध झाला. ब्रिटिशविरोधी युतीतून त्याने अंग काढून घेतले. अमृतरावानेही युतीचा विश्वासघात केला होता. त्यामुळे आता शिंदे - भोसले यांना ब्रिटिशांशी लढण्याशिवाय पर्याय नव्हता.

## ➢ शिंदे व भोसले यांचा इंग्रजांकडून पराभव –

- शिंदे व भोसले हे मराठेशाहीचे दोन मोठे आधारस्तंभ होते. शिंदे तर ब्रिटिशांनाही भारी ठरतील इतके सामर्थ्यशाली असल्याची मराठयांची खात्री होती. परंतु केवळ ५ महिन्यांत शिंदे - भोसले हे ब्रिटिशांकडून पराभूत झाले व त्यांच्या ताब्यात फार मोठा प्रदेश गेला. ऑर्थर वेलस्लीने प्रथम शिंद्यांचा अहमदनगरचा किल्ला १२ ऑगस्ट १८०३ रोजी जिंकला. या किल्ल्याची संरक्षणव्यवस्था एका युरोपियन अधिकाऱ्याकडे होती. तो अधिकारी भरपूर लाच मिळाल्यामुळे इंग्रजांना जाऊन मिळाला. हा किल्ला जिंकल्याने ब्रिटिशांचा आत्मविश्वास वाढला.
- दौलतराव शिंदे यांनी औरंगाबादवर हल्ला केला. वेलस्लीची निजामाकडून मुंबई, पुणे येथून येणारी रसद तोडण्याचा प्रयत्न मराठयांनी केला. पण त्यात त्यांना अपयश आले. इंग्रजांनी शिंद्यांची आशिरगढ व ब्ऱ्हाणपूर ही महत्त्वाची ठाणी जिंकली.
- २५ डिसेंबर १८०३ रोजी आडगावच्या युद्धात पुन्हा शिंदे भोसले यांच्या फौजांचा पराभव झाला. भोसले तर आपल्या ३८ तोफा रणक्षेत्रावर टाकून पळून गेले. भोसल्यांचा गाविलगड हा किल्ला इंग्रजांनी जिंकल्याने भोसल्यांना आता तह करण्याशिवाय पर्यायच नव्हता. भोसल्यांनी १७ डिसेंबर १८०३ रोजी इंग्रजांशी स्वतंत्र तह करुन युद्धातून अंग काढून घेतले. एलिचपूरपासून जवळ असलेल्या देवगाव येथे भोसले - इंग्रज यांच्यात तह झाला.

| देवगावच्या तहातील तरतुदी (१७ डिसेंबर १८०३) |
| --- |
| १) भोसले मराठा संघातून आपले अंग काढून घेतील. |
| २) भोसले इंग्रजांच्या कोणत्याही शत्रूला नोकरीस ठेवणार नाहीत. |
| ३) कटक प्रांत सर्व प्रदेशासहित इंग्रजांना देण्यात येईल. |
| ४) निजामावरील आपले हक्क नागपूरकरांनी सोडून द्यावेत. |
| ५) वर्धा नदीपर्यंतचा पश्चिम वऱ्हाडाचा प्रदेश निजामाला देण्यात येईल. |
| ६) इतर संस्थानिकांशी भोसल्यांचा संघर्ष झाल्यास इंग्रज देतील तो निकाल भोसल्यांनी मान्य करावा. |
| ७) इंग्रज रेसिडेंट नागपूरला राहील. |
| ८) इंग्रजांनी इतर राज्यांशी किंवा संस्थानिकांशी जे तह केले असतील ते भोसल्यांनासुद्धा बंधनकारक राहतील. |

- ब्रिटिशांनी दक्षिणेत शिंदे - भोसले यांच्याशी युद्ध सुरु ठेवले व त्याच काळात उत्तरेत – शिंद्यांच्या प्रदेशावर हल्ले केले. शिंद्यांच्या ताब्यातील अनेक किल्ले, प्रदेश जिंकले. एवढेच नव्हे तर भरतपूर, जयपूर, जोधपूर, उदयपूर, कोटा आदी शिंद्यांच्या मांडलिक राजपूत राजांशी तह करुन त्यांना शिंद्यांपासून फोडले. भोसल्यांप्रमाणे दौलतराव शिंदे यांच्याशी तह केला.

## ➢ सुर्जी - अंजनगावचा तह – ३० डिसेंबर १८०३

१. शिंद्यांनी गंगा – यमुना दुआबातील त्यांच्या ताब्यातील प्रदेश, दिल्ली, आग्रा यातील प्रदेश, बुंदेलखंडाचा काही भाग, भडोच, अहमदनगरचा किल्ला व अजिंठयापासन गोदावरीपर्यंतच्या प्रदेशाचा ताबा ब्रिटिशांना द्यावा.
२. शिंद्यांनी मोगल सम्राट, पेशवा, निजाम व बडोद्याचे गायकवाड आदींनी वरील आपले सर्व अधिकार सोडून द्यावेत.
३. इंग्रजांनी ज्या संस्थानिकांशी तह करुन तैनाती फौजेचे करार केले असतील त्यांना मान्यता द्यावी.
४. इंग्रजांच्या परवानगीशिवाय शिंद्यांनी युरोपियन माणसाला आपल्याकडे नोकरीस ठेवू नये.
५. दौलतराव शिंदे यांनी तैनाती फौज ठेवून घ्यावी असा आग्रह इंग्रजांनी धरला. परंतु त्यांनी त्यास नकार दिला. काही काळानंतर इंग्रजांनी ब्ऱ्हाणपूर व आशिरगड हे किल्ले दौलतरावास परत दिले.

- हे दोन्ही तह मराठयांच्या दृष्टीने अत्यंत अपमानकारक होते. पराभूत भोसले - शिंदे यांना पूर्णपणे नेस्तनाबूत करण्याऐवजी ते निरुपद्रवी कसे होतील याची काळजी घेतली होती. देवगावचा तह व सुर्जी अंजनगावचा तह या दोन तहांमुळे वास्तविक इंग्रज– मराठा युद्ध संपुष्टात यावयास हवे होते. परंतु प्रत्यक्षात तसे झाले नाही. यशवंतराव होळकरांच्या अस्ताबरोबर दुसरे ब्रिटिश – मराठा युद्ध संपुष्टात आले. म्हणजे यशवंतराव होळकराचे पारिपत्य दुसऱ्या ब्रिटिश – मराठा युद्धाचाच एक भाग आहे.

## ➢ यशवंतराव होळकरांचा अस्त –

- जयपूरचे राज्य इंग्रजांचे मित्रराज्य होते तरीही यशवंतराव होळकरांनी त्या राज्यात लूट केली. जयपूरमध्ये खंडणी वसुलीचे आपणास अधिकार आहेत. असा त्याचा दावा होता. यशवंतराव होळकरास नेस्तनाबूत करण्याचे ब्रिटिशांनी ठरवले होते. त्याचाच एक भाग म्हणून लॉर्ड वेलस्लीने कर्नल मॉनसॉन यास प्रचंड फौज देऊन मावळ प्रांतात पाठवले. हे वृत्त समजमाच यशवंतराव होळकरांनी जयपूरातून माघार घेतली व माळव्याकडे निघाला.
- यशवंतराव होळकराला कोंडीत पकडण्याची एक योजना ब्रिटिश सेनापतीने आखली होती. यशवंतराव होळकरांनी पैशांसाठी शिंद्यांच्या ताब्यातील मंदसोर लुटले. यशवंतराव होळकरांनी लष्कर उभारणी करुन ब्रिटिशांशी लढा देण्याची जय्यत तयारी केली होती.

- ८०,००० फौजेनिशी मॉनसॉनच्या सैन्यावर यशवंतराव होळकरांनी आकस्मिक हल्ला केला. इंग्रजांचा दारुण पराभव झाला. या पराभवाचे दु:ख ब्रिटिशांना झाले, परंतु यशवंतराव होळकरांचा आत्मविश्वास मात्र वाढला. त्याने मथुरा जिंकले व दिल्लीवरही हल्ला चढविला (८ ऑक्टोबर १७०४). लॉर्ड लेकने फौज घेऊन दिल्लीकडे कूच केली; पण यशवंतराव त्याचा प्रतिकार करण्याऐवजी दिल्ली सोडून अयोध्येकडे निघाला. वास्तविक इंग्रज व रणजितसिंग यांच्यात मित्रत्व असतानाही यशवंतराव होळकरांची त्याने उघड बाजू घेतली.
- यशवंतराव होळकरांनी ब्रिटिशांच्या विरुद्ध सर्व मुत्सद्दी, सेनापती यांनी एकत्र यावे अशी हाक दिली. त्यानुसार साबलगड येथे मेळावा भरला. मराठयांच्या इतिहासात या मेळाव्यास महत्त्वाचे स्थान आहे. पण दुर्दैवाने यशवंतराव होळकर व दौलतराव शिंदे यांच्यात एकी होऊ शकली नाही. होळकरांशी जे युद्ध सुरु होते त्यासंदर्भात लॉर्ड वेलस्लीला कंपनीने परत बोलावून घेतले. त्याच्या जागी लॉर्ड कॉर्नवॉलीसला नियुक्त केले. त्याने तटस्थतेच्या धोरणाचा व संस्थानिकांच्या सार्वभौमत्वाचा आदर करण्याचे धोरण अंगीकारले. पण लॉर्ड कॉर्नवॉलीसचे आकस्मिक निधन झाले. कर्नल मॉनसॉनच्या तंबीनुसार यशवंतराव होळरांनी जेनकिन्सची मुक्तता केली.
- इंग्रजांच्या सूचनेनुसार यशवंतरावांनी दौलतराव शिंदेंशी कोणतेही संबंध न ठेवण्याचे मान्य केले. २१ नोव्हेंबर १८०५ ला दौलतराव शिंदेंशी करार करुन त्यास ४ लाखांची आणि पत्नी व मुलीस वार्षिक २ लाखांची पेन्शन योजना देण्याचे मान्य केले. तसेच राजपूत व माळव्यातील राजांशी त्याचे जे संबंध होते ते मान्य केले. पण या करारामुळे यशवंतराव होळकरांना दु:ख झाले, त्यांनी शेवटचा प्रयत्न म्हणून इंग्रजांविरुद्ध पतियाळाचा राजा व राजा रणजितसिंग यांची भेट घेऊन मदत करण्याचे आश्वासन मिळवले. पण ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढणे अशक्य आहे हे रणजितसिंगाला माहीत होते. त्याने इंग्रजांशी एक गुप्त करार करुन आपण यशवंतराव होळकरांना कोणतीही मदत करणार नाही असे आश्वासन दिले. शेवटी यशवंतराव होळकरांनी इंग्रजांबरोबर २४ डिसेंबर १८०५ रोजी राजपूरघाटचा तह केला. त्या तहानुसार
  १) चंबळ नदीच्या उत्तरेकडील व पश्चिमेकडील प्रदेशांचा त्याग करण्याचे यशवंतराव होळकरांनी मान्य केले.
  २) चंबळच्या दक्षिणेकडे व पुर्वेकडच्या प्रदेशावर यशवंतरावांचा हक्क मान्य करण्यात आला.
- इ.स. १८०५ नंतर यशवंतराव होळकरांची स्थिती वाईट होत गेली. सैन्य होते; पण त्याच्या पगारासाठी पैसा नव्हता. तोफा - बंदुका तयार करण्याचे काम तो स्वत: करु लागला. पराभवाचे दु:ख, मद्यपान, पुतण्या खंडेरावाचे निधन, कारखान्यातील अंगमोड मेहनत यामुळे त्याचे मानसिक संतुलन बिघडले. तो अक्षरश: वेडा झाला. त्याच अवस्थेत ३ वर्षे काढल्यानंतर तो इ.स. १८११ मध्ये मृत्यू पावला त्याच्या मृत्यूमुळे दुसरे इंग्रज – मराठा युद्ध संपले.
- दुसऱ्या – इंग्रज मराठा युद्धाचा सर्वात महत्त्वाचा परिणाम म्हणजे मराठयांचे स्वातंत्र्य नष्ट झाले. सार्वभौमत्व नष्ट झाले. या युद्धानंतर बंगाल, मद्रास येथून मुंबईपर्यंतचा प्रदेश ब्रिटिशांच्या ताब्यात गेला.

## तिसरे इंग्रज – मराठे युद्ध (इ.स. १८१७ - १८)

- इ.स. १८०३ मध्ये पेशवेपदाची प्राप्ती ब्रिटिशांच्या साहाय्याने झाल्यानंतर दुसऱ्या बाजीरावाने अनेक चुका केल्या. वास्तविक शिंदे - होळकर - गायकवाड हे मराठा राज्यसंघातून बाहेर पडले होते व त्यांच्याशी इंग्रजांनी स्वतंत्रपणे करार केले होते. पण ही वस्तुस्थिती त्याने विचारातच घेतली नाही. वसई तहाची पर्वा न करता दुसरा बाजीराव, शिंदे - भोसले, होळकर - गायकवाड या मोठया व इतरही लहान सरदारांवर आपले नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करु लागला. सरदारांचा छळ करणे व त्यांच्याविरुद्ध कारस्थान करणे यात स्वत: ची शक्ती खर्च करु लागला.
- दुसऱ्या बाजीरावाने स्वत: भोवती जी माणसे जमा केली होती त्यात खंडेराव रास्ते, सदाशिव माणकेश्वर त्र्यंबकची डेंगळे, बाळाजीपंत नातू, बाळाजी कुंजर, सर्जेराव घाटगे आदींचा उल्लेख करावा लागेल. ही सर्व माणसे तृतीय दर्जाची व कर्तबगारशुन्य होती. खंडेराव रास्ते व सदाशिव माणकेश्वर हे मुख्य सल्लागार चारित्र्यहीन, स्वार्थी व अप्रामाणिक होते. प्रजेचे कल्याण करणे हे ध्येय त्यांच्यापुढे कधीच नव्हते. स्वत:ला पैसा जास्त कसा मिळेल. याकडे त्यांचे लक्ष होत. महसूल अधिकाऱ्यांच्या पदाचा लिलाव करण्याची नवी पद्धत त्याने शोधून काढली होती. या पद्धतीमुळे त्यास भरपूर पैसा मिळाला; पण शेतकरी मात्र रसातळाला गेला. या मार्गाने त्याने ५ कोटी रु. जमा केले.
- फेब्रुवारी १८११ मध्ये एल्फिन्स्टन हा इंग्रजांचा अधिकारी म्हणून आला. त्याचे व दुसऱ्या बाजीरावाचे कधीच पटले नाही. अनेक मराठा सरदारांना स्वत:चे सैन्य ठेवण्याचे अधिकार होते. त्यासाठी त्यांना जहागिरीही होत्या. परंतु बाजीरावाने स्वत:चे उत्पन्न वाढवण्यासाठी त्यांच्या जहागिरी कमी करण्याचा प्रयत्न केला. शेवटी या तंटयात एल्फिन्स्टनने मध्यस्थी केली. या जहागीरदारांविरुद्ध तैनाती फौजेचा वापर करु द्यावा ही मागणी एल्फिन्स्टनने फेटाळली. दुसऱ्या बाजीरावावर इंग्रज व इतर सरदारांनी १९ जुलै १८१२ रोजी करार लादला. तो पंढरपूर करार (१९ जुलै १८१२) या नावाने ओळखला जातो.
  १) दोन्ही पक्षांनी भूतकाळ विसरावा.
  २) सनदेतील तरतुदींशिवाय पेशव्यांनी आपल्या जहागीरदारांकडून कोणत्याही जास्तीच्या मागण्या करु नयेत.
  ३) इंग्रजांच्या परवानगीशिवाय पेशव्यांनी कोणत्याही जहागीरदाराची जहागीर जप्त करु नये.
  ४) जहागीरदार व त्यांचे नातेवाईक यांचे संरक्षण ब्रिटिश करतील.
  ५) जहागीरदारांशी स्वतंत्र तह करण्याचा अधिकार इंग्रजांना राहील.
  ६) कायदेशीर अधिकार नसलेल्या जमिनी पेशव्यास जहागीरदारांनी परत द्याव्यात .
  ७) पेशव्याने आपल्या हाताखालील जहागीरदारांना सन्मानाची वागणूक द्यावी.

## ➢ पेशवे व बडोद्याचे गायकवाड यांच्यातील संघर्ष –

- बडोद्याचे गायकवाड पेशव्यांना दरवर्षी २४ लख रु. खंडणी व नजराणे देत होते. गायकवाडाचे खंडणी व नजराणे यापोटी एकूण तीन कोटी रु. पेशव्यास देणे होते. बाजीराव पेशव्याने या थकीत रकमेची मागणी पेशव्यांकडे केली. या थकीत रकमेसंबंधी पेशव्यांशी बोलणी करण्यासाठी फत्तेसिंह गायकवाड यांनी गंगाधरशास्त्री या वकिलास पुण्यास पाठविले. एक वर्षभर त्याचा मुक्काम पुण्यास होता. पण वाटाघाटी संपत नव्हत्या. गंगाधरशास्त्रीला बाजीरावाने दिवाणपद देऊ केले. त्याच्यावर प्रेमाचा वर्षाव केला. नाशिक, त्र्यंबकेश्वर व पंढरपूर येथील धार्मिक यात्रांमध्ये त्याला सामावून घेतले. परंतु पंढरपूरच्या मंदिरातच दुसऱ्या बाजीराव पेशव्याचा कारभारी त्र्यंबकजी डेंगळे यांनी हस्तकामार्फत गंगाधरशास्त्रीचा खून केला. त्यामुळे महाराष्ट्रात मोठी खळबळ उडाली.
- शाहीर सगनभाऊंनी म्हटले आहे की, 'गंगाधरशास्त्रीवरुन मराठा राज्याचा नाश झाला.' त्या घटनेचा अहवाल एल्फिन्स्टनने ग.ज. कडे पाठवला. एल्फिन्स्टनने या खुनास त्र्यंबक डेंगळे हेच कारणीभूत असून त्यास तुरुंगात डांबून ठेवावे असे दुसऱ्या बाजीरावास कळवले. शेवटी इंग्रजांच्या आग्रहाखातर त्र्यंबकजी डेंगळे यास इंग्रजांच्या स्वाधीन केले गेले. त्यास ठाण्याच्या तुरुंगात ठेवण्यात आले हाते; परंतु त्र्यंबकजी डेंगळे याने अत्यंत हुशारीने १२ सप्टेंबर १८१६ रोजी तुरुंगातून पलायन केले. या घटनेमुळे इंग्रज - बाजीराव संबंध बिघडले. त्र्यंबक डेंगळे यास पकडून द्यावे अशी विनंती एल्फिन्स्टनने दुसऱ्या बाजीरावास केली. बाजीरावाने ते काम सेनापती बापू गोखलेवर सोपवले. पण त्यास तो सापडला नाही. एल्फिन्स्टनने कर्नल स्मिथवर ती जबाबदारी सोपवली. परिस्थितीने गंभीर वळण घेतले. दुसऱ्या बाजीरावाने युद्धाची जय्यत तयारी केली तर एल्फिन्स्टनने ग. ज. कडे दुसऱ्या बाजीरावांविरुद्ध युद्ध करण्याची परवानगी मागितली. १३ जून १८१७ रोजी दुसऱ्या बाजीरावावर एल्फिन्स्टनने नवा करार लादला. त्यावर दुसऱ्या बाजीरावने सही केली.

१. मराठा साम्राज्याचे प्रमुखपद सोडावे.
२. अहमदनगरचा किल्ला, नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेशांवरील आपले हक्क सोडावेत व त्यासंबंधीचे हक्क ब्रिटिशांना द्यावेत.
३. बुंदेलखंड, माळवा या प्रदेशांवरचे हक्कही त्याने सोडावेत. ते प्रदेश ब्रिटिशांना द्यावेत.
४. त्र्यंबकजी डेंगळे हे खुनी आहेत हे पेशव्याने जाहीर करुन त्यास ब्रिटिशांच्या स्वाधीन करावे. तोपर्यंत ओलीस म्हणून त्र्यंबकजी डेंगळेचे कुटुंब ठेवावे.
५. मराठा सरदार किंवा इतर कोणत्याही परकीय सत्ता यांच्या दरबारी पेशव्याने आपले वकील ठेवू नयेत किंवा त्यांचे दूत पेशव्याच्या दरबारी राहू नयेत.
६. कोल्हापूरचा राजा व वाडीचे सावंत यावरील हक्क पेशव्याने सोडून द्यावेत.
७. आपल्या पदरी असलेल्या इंग्रजांच्या तैनाती फौजेची संख्या वाढवावी.
८. गायकवाडांकडील थकबाकीच्या प्रश्नाचा निकाल इंग्रजांनी दुसऱ्या बाजीरावाच्या विरुद्ध दिला. ती थकबाकी गायकवाडांना माफ करण्यात आली.
९. वार्षिक ४ लक्ष रु. च्या मोबदल्यात बडोदा सरकारवरील सर्व हक्क व मागण्या सोडून द्याव्यात.
१०.साडेचार लक्ष रु. भाडेपट्टयाने अहमदाबादचा सुभा पेशव्याने गायकवाडांच्या नावे करुन द्यावा.

## ➢ दुसऱ्या बाजीरावकडून इंग्रजांशी लढण्याची जय्यत तयारी –

- प्रस्तुत करारातील अटी या अत्यंत जाचक व अपमानकारक होत्या. दुसऱ्या बाजीरावाने इंग्रजांचे वर्चस्व कायमचे झुगारुन देण्याचे ठरविले. त्यासाठी त्याने नागपूरचे अप्पासाहेब भोसले, दौलतराव शिंदे व मल्हारराव होळकर यांच्याशी पत्रव्यवहार करुन इंग्रजांविरुद्ध मदत मागितली. दुसऱ्या बाजीरावाने वरील करारावर सही केली असली तरी तो मनातून निराश होता. इंग्रजांच्या वर्चस्वातून मुक्त व्हावे असे त्यास वाटत होते.
- नागपूरकर भोसले व दौलतराव शिंदे यांचे महत्त्व साम्राज्य इंग्रजांनी कमी केल्यामुळे ते पण इंग्रजांवर नाराज होतेच. सर्व भारतीय सत्ताधीशांची इंग्रजांविरुद्ध एकजूट करण्याचा प्रयत्न दुसऱ्या बाजीरावाने केला. लष्करभरतीचे काम हाती घेतले. किल्ल्यांची डागडुजी, साधनसामग्री व संरक्षण व्यवस्था याकडे लक्ष दिले.
- मराठा सरदारांतील अंत:कलह मिटवून राष्ट्रकार्याकरिता शत्रूंविरुद्ध एकजूट व्हावी. याकरिता पेशव्याने प्रयत्न केले. तसेच छत्रपतीने राष्ट्राच्या शत्रूंविरुद्ध लढयात सहकार्य द्यावे यासाठीही प्रयत्न केले. एवढेच नव्हे तर राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे रक्षण झाल्यानंता सर्व सत्ता छत्रपतीच्या हाती सोपवून त्यांचे हुकूम मानण्याचेही आश्वासन त्याने छत्रपतीला दिले. पेशव्याचे हे प्रयत्न चालू असताना पेशव्यांकडील बातम्या बाळाजीपंत नातू, यशवंतराव घोरपडे, साताऱ्याच्या छत्रपतीचा चिटणीस व अन्य लोकांकडून एल्फिन्स्टनला समजत होत्या. त्याने लढण्याचा बेत पक्का केला आहे हे इंग्रजांना माहीत होते. त्यांनीही युद्धसज्जता केली होती.

## ➢ प्रत्यक्ष युद्ध - बाजीरावाचे पलायन व पेशवाईची अखेर –

- ५ नोव्हेंबर १८१७ रोजी इंग्रज – मराठा युद्ध खडकी येथे झाले. पण तेथील लढा अनिर्णीत राहिला. १६ नोव्हेंबरला येरवडा येथील लढाईत मराठयांचा पराभव झाला. हे युद्ध चालू असताना दुसरा बाजीराव मात्र पर्वतीच्या टेकडीवरुन युद्धाचे चित्र पाहत होता. बापू गोखले प्रत्यक्ष युद्धात सहभागी होता.

- ५००० पायदळासह हजर असलेले सरदार विंचूरकर मात्र स्वस्थ बसले व त्यांनी ब्रिटिश सैन्याला तोफखान्यापर्यंत येऊ दिले. येरवडयाच्या विजयानंतर ब्रिटिशांनी मराठयांच्या सत्तेचे केंद्रस्थान असलेल्या पुण्याच्या शनिवारवाडयाचा ताबा घेतला. स्वत: बाळाजीपंत नातू यांनी पेशव्यांचा ध्वज खाली उतरवून ब्रिटिशांचा युनियन जॅक शनिवारवाडयावर लावण्याचे काम केले. १७ नोव्हेंबर १८१७ रोजी बाजीरावाने पर्वतीहून पलायन केले. आपली फौज पराभूत झालेली त्याने पाहिले होते. तो पुरंदरहून माहुली व नंतर पंढरपूरला गेला. तेथे बापू गोखले व साताऱ्याचा छत्रपती भोसले त्यास येऊन मिळाले. इंग्रजी फौजेने दुसऱ्या बाजीरावाचा पाठलाग चालविला होताच.
- शेवटी १ जानेवारी १८१८ रोजी भीमा कोरेगाव येथे व १९ फेब्रुवारी १८१८ रोजी आष्टा येथे झालेल्या युद्धात दुसरा बाजीराव पूर्णपणे पराभूत झाला. त्यानंतर बाजीराव शिंदे - भोसले - होळकर यांची मदत मिळेल या आशेने तिकडे पळाला; पण त्यापूर्वी इंग्रजांनी भोसले - होळकरांचा पराभव केला होता. शेवटी निराश होऊन ४ जून १८१८ रोजी तो ब्रिटिशांच्या स्वाधीन झाला. ब्रिटिशांनी त्यास ८ लक्ष रु. पेन्शन दिली. मराठी राज्याचे अस्तित्वच संपुष्टात आले. ब्रिटिशांच्या लष्करी सामर्थ्याच्या भीतीने शिंदे व इतर सरदार मूग गिळून गप्प बसले. खुद्द पेशव्यांच्या गोटातील अनेक सरदार ब्रिटिशांशी आतून संधान साधून होते. अर्ध्याधिक भारतावर ब्रिटिशांची सत्ता स्थिरावली होती. त्यांचे सामर्थ्य प्रचंड होते. युद्धनीती व राजनीतीत ते कुशल होते. त्यामुळे शेवटी ते विजयी झाले व पेशवाई अस्त पावली.

### ➤ दुसऱ्या बाजीरावचे अखेरचे दिवस –

- दुसऱ्या बाजीराव पेशव्याला वार्षिक ८ लक्ष रुपये पेन्शन देऊन ब्रिटिशांनी उत्तर प्रदेशात कानपूरजवळील विठूर येथे ठेवले होते. त्याचा परिवार मोठा होता. बाजीराव स्त्रीलंपट होता. १८१८ पूर्वीच पुण्यात त्याचे ५ विवाह झाले होते. त्याला ५ मुली होत्या, २ मुले होती. पण मुले जिवंत नव्हती. विठूर येथे त्याने ६ विवाह केले. त्याशिवाय त्याच्या मर्जीतल्या ६ स्त्रिया होत्या. पुत्र नाही म्हणून त्याने धोंडोपंतास दत्तक घेतले. (धोंडोपंत हा माथेरानजवळील वेणगाव येथील माधव भट यांचा मुलगा होता.) १८३९ मध्ये तयार केलेल्या मृत्यूपत्रात धोंडोपंत हे आपले वारसदार आहेत असे म्हटले होते. जर आपणास औरस पुत्र झालाच तो वारस होईल असे म्हटले होते. ६४ वर्षे वय असणाऱ्या दुसऱ्या बाजीरावास आणखी मुलाची अपेक्षा होती हे आश्चर्य होय. पण ती अपेक्षा पूर्ण झाली नाही. इंग्रजांनी धोंडोपंतास बाजीरावाचा वारस म्हणून मान्यता दिलीच नाही. त्यांची प्रकृती ढासळत गेली. त्यांना अंधत्व आले. २८ जानेवारी १८५१ रोजी विठूर येथे त्यांचे निधन झाले.
- **'ज्ञानोदय' पत्राने १५ मे १८५१ च्या अंकात लिहिलें** – 'ते थोर कुळातील होते व मोठया योग्यतेचे होते. तथापि वर्तणूक वा आचार चांगला नव्हता. यास्तव अपकीर्तीही तशीच राहिली.' बाजीरावाने विठुरात काही मंदिरे, वाडे, घाट बांधले.

| कालावधी | तह / महत्त्वाच्या घटना |
|---|---|
| पहिले १८७५-१८८२ | • सुरत तह, पुरंदरचा तह, वडगावचा तह, सालबाईचा तह |
| दुसरे १८०३-१८०५ | • वसईचा तह, देवगावचा तह, अंजनगावचा तह, राजघाटचा तह |
| तिसरे १८१७-१८१८ | • मंदसोर तह (इंग्रज-होळकर १८१८) |

## म्हैसूर युध्दे

- हैदरअली हा म्हैसुरचा शासक होता (मुळ घराणे वाडीयार) आणि त्याला फ्रेंचांची मदत मिळत होती. डिंडीगल येथे त्याने स्वत:चे शस्त्रागार स्थापन केले होते. स्वत:च्या सामर्थ्यावर त्याने म्हैसूरचे राज्य निर्माण केले. इंग्रजांना म्हैसूर प्रांत हवा होता. हैदरने म्हैसुरच्या राज्यात सुरुवातीला एक सैनिक पेशव्यांच्या मदतीने फेत्तेह हैदर बहाद्दुर श्रीरंगपट्टणमचे संरक्षण केल्यामुळे १७६१ मध्ये नमरांजार यास पराभूत करून सत्ता मिळवली. इंग्रजांनी निजामाशी हैदर अलीच्या विरोधात हातमिळविणी केली.

### ➤ पहिले इंग्रज-म्हैसुर युध्द – (१७६७-६९) :-



- इंग्रजांनी हैद्राबादचा निजाम आणि मराठे यांनी एकत्र येऊन हैदरअलीविरुध्द युध्द पुकारले.
- इंग्रजांविरुद्ध दक्षिणेतील भारतीय सत्तांना एकत्र आणण्याचा प्रयत्न. मराठे व निजाम यांना फोडून इंग्रजांचा सेनापती कर्नल स्मिथचा हैदरअलीने पराभव केला आणि कर्नाटकावर आक्रमण केले.
- हैदरअलीने पैसे देऊन मराठयांना तर निजामाना प्रदेश देऊन फोडले.
- मंदसोरचा तह ४ एप्रिल १७६९ साली इंग्रज व हैदरअली यांच्यात होऊन युध्द थांबले. या तहानुसार एकमेकांना मदतीचे आश्वासन दिले.
- यानुसार एकमेकांचे जिंकलेले प्रदेश परत केले.

## ➢ दुसरे इंग्रज-म्हैसुर युध्द (१७८०-१७८४) / मंगलोरचा तह (१७८४) :-



- १७७१ साली मराठयांनी हैदरवर आक्रमण केले. १७६९ च्या तहानुसार इंग्रजांनी मदतीचे दिलेले आश्वासन पाळले नाही. त्यामुळे दुसरे अँग्लो म्हैसुर युध्द उद्‌भवले.
- फ्रेंच व हैदरअली एकत्र येतील या भीतीने इंग्रजांनी ‘माहे’ या बंदरावर १७८० मध्ये हल्ला केला. हैदरला फ्रेंचाकडून महत्त्वाची युध्दसामग्री याच बंदरातून मिळत होती.
- यावेळी मराठे, निजाम व हैदरअली हे इंग्रजाविरुध्द एकत्र आले. हैदरने कर्नाटकवर आक्रमण करुन मेजर मन्रोला हरवले.
- मे १७८२ मध्ये मराठयांनी सालबाईचा तह करुन हैदरचा पाठिंबा काढून घेतला. तरीही हैदरने इंग्रज अधिकारी आयर कुटचा पराभव केला.
- त्यानंतर हैदरअलीचा आजारपणामुळे मृत्यु झाल्याने (१७८२) त्याचा मुलगा टिपू सुलतान याने इंग्रजांशी युध्द सुरुच ठेवले.
- १७८४ मध्ये मंगलोर तहाने हे युध्द थांबले आणि टिपू व इंग्रजांनी एकमेकांचे जिंकलेले प्रदेश परत केले.

## ➢ तिसरे इंग्रज म्हैसुर युध्द (१७९०-९२) :-




- लॉर्ड कॉर्नवॉलिसच्या काळात हे युध्द झाले.
- त्रावणकोरच्या राजाने टिपूच्या राज्यातील भागात हस्तक्षेप केल्यामुळे टिपूने त्रावणकोरवर आक्रमण केले (१७९०). या युध्दाचे कारण ठरले-त्रावणकोरचे राज्य.
- इंग्रज त्रावणकोरच्या मदतीसाठी गेले आणि त्यांनी टिपूवर आक्रमण करुन त्याची राजधानी श्रीरंगपट्टणम पर्यंत मजल मारली.
- १७९२ ला श्रीरंगपट्टणमच्या तहाने युध्द थांबले. त्या तहानुसार कॉर्नवॉलिसने टिपूचे जवळपास अर्धे राज्य आपल्या ताब्यात घेतले.
- तेथील राजाने तसेच टिपूच्या संरक्षणाखालील कोचीन संस्थानचा भाग घेण्याचा प्रयत्न केला. टिपूला हा हस्तक्षेप आवडला नाही. तसेच म्हैसूरच्या काही बंडखोरांनी त्रावणकोरमध्ये आश्रय घेतला होता. त्यांना त्रावणकोरच्या राजाने टिपूला परत केले नाही. त्यामुळे संतप्त टिपून १७९० ला त्रावणकोरवर हल्ला केला.
- तत्पूर्वी १७८४ ला इंग्रज त्रावणकोर तह झाला. या तहनुसार एकमेकांना मदत करण्याचे ठरले.
- इंग्रज + निजाम + मराठे X टिपू असे समीकरण तयार झाले. कॉर्नवॉलिस वेलोरमार्गे बेंगलोरला गेला. व ते जिंकले (मार्च १७९१)

१. नंतर टिपूची राजधानी श्रीरंगपट्टणम् जवळ पोहोचला.
२. श्रीरंगपट्टणम्चा तह (मार्च १७९२) टिपू व कॉर्नवॉलिस यांच्यात झाला. यानुसार टिपूला अर्धे राज्य गमवावे लागले.
३. कावेरी नदीच्या दक्षिण व पश्चिमेकडील प्रदेश इंग्रजाच्या ताब्यात राहिला.
४. इंग्रजांना बारामहल ,दिंडीगुल ,मालबार प्रदेश मिळाला.
५. मराठयांना तुंगभद्रा नदीचा उत्तर भाग दिला.
६. निजामाला पेन्नार व कृष्णा नदीमधील भाग मिळाला.
७. युध्दखंडणी ३.६ कोटी (टिपूवर) लादण्यात आली.
८. कॉर्नवॉलिस – We have effectively crippled our enemy without making our friends too ‘formidable’.

- **गो.स. सरदेसाईच्यामते,** “प्लासीच्यालढाईने इंग्रजसत्ताइतरहिंदीसत्ताधीशांच्या बरोबरीनी बनलीतर श्रीरंगपट्टमच्या लढाईने तीसार्वभौम बनली.”

## ➢ चौथे इंग्रज-म्हैसुर युध्द (१७९९) :-



- लॉर्ड वेलस्लीच्या काळात हे युध्द झाले.
- टिपूला दुसऱ्या म्हैसूर युद्धाचा पराभव व अपमानाचा सूड घ्यायचा होता.
- १७९८ मध्ये वेलस्ली याला टिपूने फ्रान्स, अरेबिया, काबुल व तुर्कस्तानच्या शासकांकडून मदत मिळविणाचा प्रयत्न केला.
- वेलस्लीने ब्रिटिशांविरुध्द कारस्थान रचल्याचा आरोप करुन टिपुवर हल्ला केला.
- ४ मे १७९९ रोजी वेलस्लीने टिपुला ठार केले. या युध्दानंतर म्हैसुरने तैनाती फौजेचा स्वीकार केला. निजामाला काही प्रदेश इंग्रजांकडून देण्यात आला.

- **डॉ.ईश्वरीप्रसाद** म्हणतात, "इंग्रजांचे विस्तारवादीधोरणलपविण्यासाठीत्याने म्हैसूरच्या गादीवरतेथीलराजाचीचप्रतिष्ठापना केली."

- सेनापती आर्थर वेलस्ली (लॉर्ड वेलस्लीचा भाऊ)
- वेलस्लीने टिपूवर आरोप लावले की :-
- तो मराठे व निजाम मिळून इंग्रजांविरुध्द कारस्थान करत आहे.
- अरब, अफगाण, तुर्की, मॉरिशस व थेट फ्र ान्सच्या संचालक मंडळाशी पत्रव्यवहार करुन इंग्रजविरुध्द मोठे संगठन करत आहे.
- यावर टिपूचे उत्तर समाधानकारक न वाटल्याने १७९९ ला वेलस्लीने त्याविरोधी मोहीम काढली.
- सडासीर व मालावलीच्या लढाईत टिपूचा पराभव झाला.

- ४ मे १७९९ श्रीरंगपट्टणम् किल्ल्यास वेढा या युध्दात टिपू धारातीर्थ पडला.
- तहानुसार-कन्नड, कोईमतूर, वेनाड, धारपूरम् व म्हैसूरचा किनारा इंग्रजांकडे राहीला.
- काही प्रदेश निजामाला देण्यात आला.
- म्हैसूरचे छोटे राज्य वडियार घराण्याच्या तिसऱ्या कृष्णराजला देण्यात आले.
- दिवाण म्हणून पूर्णय्याची नेमणूक केली. (जो टिपूचाही दिवाण होता.) म्हैसूरने तैनाती फौज स्वीकारली.

| कालावधी | तह / महत्त्वाच्या घटना |
|---|---|
| **पहिले १७६७-१७६९** | ➢ इंग्रजांचा पराभव (हैदरअलीने केला) |
| **दुसरे १७८०-१७८४** | ➢ मंगलोरचा तह<br>➢ हैदरअलीचा मृत्यु |
| **तिसरे १७८९-१७९२** | ➢ श्रीरंगपट्टणम्चा तह |
| **चौथे १७९९** | ➢ टिपूचा मृत्यु<br>➢ म्हैसुरने तैनाती फौज स्वीकारली |

❑ **टिपूची योग्यता :-**

१) राज्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी जहागीर पद्धत रद्द केली.

२) अयोग्य कर कमी करून शेती सुधारणा

३) श्रीरंगपट्टणम येते त्याने स्वातंत्र्याचा वृक्ष लावला.

## इंग्रज - शीख युध्द

- ब्रिटिशांशी केलेल्या कराराबाबत तो जीवनभर प्रामाणिक राहिला. रणजीत सिंह सुकरचाकीयाचा प्रमुख महासिंह यांचा मुलगा रणजीत सिंह होय. त्याचा जन्म गुजरानवाला येथे १३ नोव्हेंबर १७८० रोजी झाला. महासिंहाच्या मृत्यूच्या वेळी रणजीतचे वय फक्त १२ वर्षे होते. पण त्याने लवकरच राजकीय स्थितीवर आपली पकड बसविली. १७९७ ते १८३९ पर्यंत रणजीत सिंहाने शिखांचा राज्यकारभार अत्यंत चोख बनविला.

### ❖ अमृतसरचा तह :-

- १८०९ मध्ये रणजितसिंहाने इंग्रजांशी अमृतसरचा (मैत्रीपूर्ण) तह केला. इंग्रजी सत्तेकडून भविष्यात म्हैसूरच्या राज्याला धोका होऊ नये. हा या तहाचा मुख्य उद्देश होता.
- १८३९ मध्ये रणजितसिंगच्या मृत्यूनंतर पंजाबमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झाली. शिख सरदारांमध्ये सत्तेवरुन संघर्ष सुरु झाला. यातुनच रणजीत सिंहाचा मुलगा दलिप सिहांस पंजाबच्या गादीवर बसवले व राणी जिंदन कौर सत्ता आपल्या हातात घेतली.
- १८४३ मध्ये रणजित सिंगचा मुलगा दलिप सिंग यास गादीवर बसविले.
- पंजाबनंतर रणजितने सिंधवर ताबा घेण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिशांनी गोडीने त्याला परावृत्त केले. ऑक्टोबर १८३१ ला गर्व्हनर जनरल बेंटिक व रणजित यांच्यात रुपर (रोपड) येर्थ मैत्री करारचे नुतनीकरण झाले.
- सिंधू नदीच्या पश्चिमेकडील शिकापूर जिंकता येणार नाही असे त्यांनी सांगितले. वास्तविक त्यामुळे १८०९ च्या कराराचा भंग होणार नव्हता. रणजितने वाद मोडला.
- १८३८ मध्ये लष्करी तळ म्हणून त्याचा वापर करण्यास सुरुवात केली तेथून राजधानी लाहोर फक्त ४० मैलावर होती.
- ब्रिटिशांचे रणजितसिंगाशी संबंध त्यांचा उघडानागडा स्वार्थ व 'बळी तो कान पिळी' या आधारावर होते.

## ❖ रणजितच्या प्रशासनातील दोष :-

- सैनिकांचे पगार वेळेवर नाही.
- मर्जीतील अधिकारी प्रशासनात जे अकार्यक्षम होते.
- रणजितने तीन डोग्रा बंधूना राजा किताब दिला. गुलाबसिंग, ध्यानसिंग (दरबारात मुख्यमंत्री), सुचेतसिंग रणजितच्या मृत्यूनंतर लष्कर प्रमुख झालेले लालसिंग-तेजसिंग-शीख नव्हते. रणजितला शीखांबद्दल साशंकता होती.
- सर्व एकमेकांना खालसाचे समान सदस्य मानत. त्यामुळे एका शिखाला ते राजा म्हणून स्वीकारतील किंवा नाही या शंकेने शीखेतरांना जबाबदारीची पदे दिली. तसेच त्याच्या उदय काळात शीखांमध्ये पदायोग्य माणसे आढळली नाहीत.
- रणजितने ब्रिटिशांसोबत करार पाळले पण ब्रिटिशांनी त्यांनी पाळले नाही.
- रणजितसिंहाचे चारित्र्य उच्च दर्जाचे नव्हते, नितिमत्तेचा अभाव, राणी जिंदन विषयासक्त तिच्या चारित्र्याबद्दल चर्चा होत असे.

## ❖ इंग्रज शीख युध्द :-

- पंजाबमध्ये रणजितसिंहाने सर्व सत्ता ताब्यात घेतली होती.
- इंग्रजांशी शत्रुत्व नको असल्यामुळे रणजितसिंहाने १८०९ साली इंग्रजांशी अमृतसर येथे मैत्रीचा करार केला आणि ब्रिटिशांच्या शत्रूंशी संबंध न ठेवण्याचे मान्य केले होते. मात्र इंग्रजांना सिंध नंतर पंजाब प्रांत हवा होता. तसाच संपूर्ण हिंदूस्थान आपल्या अधिपत्त्याखाली आणावयाचा होता.
- रणजितसिंहाने मराठे, भोसले, शिंदे, निजाम यांना ब्रिटिशांविरुध्द मदत नाकारुन इंग्रजांशी प्रामाणिक राहीला. परंतु इंग्रजांनी मात्र तसा प्रामाणिकपणा राखला नाही.
- रणजितसिंगच्या मृत्युनंतर पंजाबमधील राज्यात दोन गट पडले. याचा फायदा इंग्रजांनी घेतला.

## ➢ पहिले इंग्रज-शीख युध्द (१८४५-४६) :-

- पंजाबच्या सुपीक प्रदेशाकडे इंग्रज नेहमीच आशाळ भूत नजरेने पाहात होते. १८४४ मध्ये लॉर्ड हार्डींग भारतात आला. तो कसलेला सैनिक असल्याने कंपनीचे सैन्य सुदृढ बनविण्यासाठी त्याने ताबडतोब आवश्यक ते प्रयत्न केले. पंजाबमध्ये कंपनीची सैन्य संख्या ३२ हजार करण्यात आली. या सैन्याजवळ ६८ तोफा, १० हजार राखीव फौज मिरत येथे ठेवण्यात आली. इंग्रजांनी १८४५ मध्ये लष्करी ताकद निर्माण करुन सतलजच्या पूर्वेकडील प्रदेशावर आक्रमण करण्याची मोहिम सुरु केली. या युध्दात मुदकी, फिरोज शाह, भौरोवाल, सुबराव आणि आणिवाल आदी लढाया झाल्या.



- १८४४ च्या सुमारास लॉर्ड हार्डीग गव्हर्नर जनरल झाला. त्याने सैन्यात वाढ केली व सतलज नदीवर पुल बांधण्याची सुरुवात केली.
- लुधियाना येथील ब्रिटिश पोलिटिकल एजंट मेजर ब्रॉड फूट होते.
- १८४५ ला शीख सैन्याचे हरिके व कसूरमधून सतलज पार केली. यावेळी इंग्रजांचे नेतृत्व केले ह्यू गफ यांनी केले.
- १८४५ मध्ये लाल सिंग (शिख सेनापती) व तेजसिंग यांचा पराभव
- हार्डिंग्जची युध्द घोषणा ही १३ डिसेंबर १८४५ ला झाली.
- या युध्दातील निर्णायक लढाया म्हणजेच :-
  - ➢ **मुदकी**
  - ➢ **फिरोजशहा**
  - ➢ **भौरोवाल**
  - ➢ **अलीवाल**

- शेवटची निर्णायक लढाई सुबरावची लढाई (सोब्रान) १० फेब्रुवारी १८४६.
- कर्नल हिरिस्मिय तेजसिंग याने इंग्रजांना मदत केली. यावेळी ग.ज. हार्डिंग्ज युध्दभूमीवर होते. शिखांचा पराभव झाला.

## ❖ लाहोरचा तह (९ मार्च १८४६) :-

- सतलजपलीकडील शीखांची सर्व राज्ये व मालमत्ता, जालंधर दोआब व हजारा हे प्रदेश ब्रिटिशांना मिळाले.
- दलिप सिंहाने शिख सैन्य कमी करण्याचे व त्यांनी शस्त्रात्रे काढून घेण्याचे मान्य केले.



- पायदळ २०,००० व घोडदळ १२,००० व १५५ कोटी युद्ध खंडणी इतकेच ठेवण्याचे मान्य केले.
- ब्रिटिशांच्या संमतीशिवाय कोणत्याही ब्रिटिश किंवा युरोपीय नागरिकांना सेवेत ठेवणार नाही.
- दलिपसिंह पंजाबचा राजा, राणी जिंदन कौर संरक्षिका व लालसिंहला वजीर म्हणून मान्यता आणि शीखांचे सैन्य कमी करुन त्यांची शस्त्रास्त्रे काढून घेतली.
- लाहौर रेसिडेंट हेनरी लॉरेन्स, पंजाबच्या अंतर्गत भागात कंपनी हस्तक्षेप करणार नाही.
- काश्मीरचा महाराजा गुलाबसिंहाला मान्यता.
- ब्रिटिश आपल्यावर आक्रमण करणार असे वाटल्याने शीखांनी इंग्रजांवर आक्रमण केले.
- फितुरी आणि इंग्रजांचे प्रबळ सैन्य यामुळे शीख पराभुत झाले आणि लाहोरच्या तहाने युध्द थांबले.

## ➢ दुसरे इंग्रज-शीख युध्द (१८४८-४९)



१८४८ साली लॉर्ड डलहौसीची गव्हर्नर जनरल म्हणून नियुक्ती झाली. त्यांनी पंजाबच्या कारभारात हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली. राणी जिंदनला कारागृहात डांबणे, पंजाबमधील राजकारणात हस्तक्षेप या इंग्रजांच्या कृत्यांमुळे दुसरे इंग्रज-शीख युध्द उद्‌भवले. फेब्रुवारी १८४९ – मध्ये गुजरात (चिनाब नदीजवळ) तोफांची लढाई झाली. या लढाईत शीखांचा पराभव झाला आणि पंजाब इंग्रजांच्या ताब्यात गेले. २९ मार्च १८४९ ला महाराजा दलिपसिंहाला पदच्युत करुन पंजाब ब्रिटिश साम्राज्याला जोडल्याची घोषणा डलहौसीने केली. ११ मार्च १८४६ ला एक पूरक तह करुन १८४६ च्या शेवटपर्यंत इंग्रज सैन्य लाहोर येथे ठेवण्याचे ठरले. ती मुदत जवळ येत असल्याचे पाहताच हार्डिंग्जने दलिपसिंह अल्पवयीन असण्याचे कारण सांगून सैन्य तेथेच कसे राहील ही व्यवस्था पाहिली, त्यांनी पंजाबच्या कारभारात हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली.

### ❖ भैरोवालचा तह (२२ डिसेंबर १८४६) :-

- या तहामूळे व्यावहारिकदृष्टया ब्रिटिश पंजाबचे खरे स्वामी बनले.
- आठ ब्रिटिशानुकूल सरदारांचे एक ‘रिजन्सी कौन्सिल’ स्थापण करुन त्या कौन्सिलने रेसिडेंटच्या मार्गदर्शनाखाली राज्याचे शासन चालवावे.
- राणी जिंदनला यांनी १.५० लाख पेन्शन देऊन राजकारणातून दूर केले. रिजन्सी कौन्सिलची ती सदस्यही नव्हती.
- लाहोर येथे ब्रिटिश फौज ठेवण्यात आली.
- १८५४ मध्ये दलिपसिंह सज्ञान होईपर्यंत ही व्यवस्था चालू रहावयाची होती.
- जानेवारी १८४८ मध्ये हार्डिंग्जऐवजी गव्हर्नर म्हणून डलहौसी याची नेमणूक झाली.
- मुलतानाचा गर्व्हनर ‘मूलराज’ याच्या बंडामुळे इंग्रजांना पंजाबवर आक्रमणाची संधी मिळाली.
- बंडाचा प्रसार इतर भागातही झाला. हजारा प्रांतांचा गर्व्हनर छतरसिंहाचे बंड व लष्कर विसर्जन सैन्याच्या पगारात कपात यामुळे शीख सैनिकात तीव्र असंतोष व नाराजी निर्माण झाली.



राजा तेजसिंहाला

- तेजसिंहाला ‘राजा’ किताब देतेवेळी ८ वर्षाच्या दिलिपसिंहाने त्याच्या कपाळावर टिळा लावण्याचे नाकारले. हा स्वत:चा अपमान समजून इंग्रजांनी राणी जिंदनला जबाबदार धरत चुनर किल्ल्यात कैदेत ठेवले.
- त्यामागचे खरे कारण असे की, ब्रिटिशांना खंबीर विरोध राणीच करु शकत होती. राणीच्या या अपमानामुळे शीखांमध्ये ब्रिटिशांविरोधी वातावरण पसरले.
- मुलतानचा गर्व्हनर सावनमल १८४४ मध्ये त्यावेळी त्याचा मुलगा ‘मूलराज’ गर्व्हनर झाला. राणीला कारागृहात डांबणे हा हार्डिंग्जने पंजाबवर केलेला अखेरचा आघात होता. जानेवारी १८४८ ला तो परत गेला व डलहौसी आला.
- लाहोर येथील ब्रिटिश एजंटही बदलला लॉरेन्सच्या जागी फ्रेंडिक क्युरी आला. हजाराचा गर्व्हनर छत्तरसिंह याच्या मुलीचा विवाह दलिपसिंहाशी ठरला होता. त्याच्याविरुध्द बऱ्याच कारवाया झाल्या. त्याचा मुलगा शेरसिंह मुलराजला १४ सप्टेंबर १८४८ ला जाऊन मिळाला.

- ब्रिटिशांनी मुलतानचा गर्व्हनर म्हणून सरदार खानसिंह याची नियुक्ती त्याच्या सोबत वॉन्स ॲन्डयू व डब्ल्यू. ए. ॲडरसन हे दोन ब्रिटिश अधिकारी दिले. त्यांच्या उदाम वर्तणुकीने प्रजा अधिकच बंडखोर झाली. हा असंतोष लॉर्ड डलहौसीला संपूर्ण पंजाबात पसरु द्यायचा होता कारण एकदाच आक्रमण करुन पंजाब ब्रिटिश साम्राज्याला जोडता येणार होते.
- रामनगरची लढाई यात इंग्रजांचे नेतृत्व ह्यू गफ याने केले रावी नदी ओलांडल्यावर संघर्ष झाला.
- सादुल्लापूरची लढाई अनिर्णित ठरली.
- जानेवारी १८४९ चिलियनवाला लढाई—शेरसिंग ब्रिटिश नेतृत्व लॉर्ड गो. ब्रिटिश हरले. यामुळे ह्यू गफच्या जागी चार्ल्स नेपियरची नियुक्ती करण्यात आली.
- फेब्रुवारी १८४९ ला गुजरात (चिनाब नदीजवळ) तोफांची लढाई 'The Battle of the Guns'.
- महत्वाची लढाई यामुळे पंजाब इंग्रजांच्या ताब्यात गेला.
- लढाई निर्णायक असण्याचे कारण तोफा होता. तीन तासांच्या तोफांच्या माऱ्याने शीखांचे बळ कोलमडले.
- १२ मार्च १८४९ ला शीखांनी चिक्रियनवाडा येथे शरणागती पत्करली.
- पंजाबचे विलीनीकरण २९ मार्च १८४९ मध्ये चिनार ला महाराजा दलिपसिंहाला पदच्युत करुन पंजाब ब्रिटिश साम्राज्याला जोडण्यात आल्याची घोषणा 'डलहौसी' ने केली.

- ६ एप्रिल १८५९ राणी जिंदनला चुनरच्या किल्ल्यात ठेवले व महाराजा दलिपसिंग यांनी मार्च १८५३ ला ख्रिश्चन धर्माची दिक्षा घेतली. नंतर जिंदलकौर नेपाळात पळून गेला.
- १८५४ ला राणी इंग्लंडला गेली. १८६३ ला राणी जिंदलचे निधन झाले. अंत्यसंस्कार नाशिकला करण्यात आले.
- १८८६ ला दलिपसिंह भारतात येण्यास निघाला. त्याला 'एडनला' अटक करुन पुन्हा इंग्लंडला पाठवले.
- एडन येथे पुन्हा दिलीपसिंहाने शीख धर्माचा स्वीकार केला.
- १८८८ ला रशियाला भेट दिली.
- २३ ऑक्टोबर १८९३ मध्ये निधन झाले.


महाराजा दलिपसिंग


राणी जिंदनला

## ❖इंग्रज - शीख युध्द :-

| कालावधी | तह / महत्त्वाच्या घटना |
|---|---|
| पहिले १८४५-४६ | लाहोरचा तह, भौरोवालचा तह |
| दुसरे १८४८-४९ | पंजाबचे विलिनीकरण, रावळ पिंडीचा तह |



## इंग्रज - अफगाण युध्दे :-

| कालावधी | तह / महत्त्वाच्या घटना |
|---|---|
| पहिले १८३९-४२ | ➢ ब्रिटिश लष्कराचे नेतृत्व - जॉन किन<br>➢ ब्रिटिशांनी 'काबुल' जिंकले परंतु युध्दातून माघार |
| दुसरे १८७८-८० | ➢ लॉर्ड लिटनच्या कारकिर्दीत झाले अफगाणचा नवा प्रमुख – शेर अली रशियाच्या वाढत्या शक्तीला आळा घालण्यासाठी शेरअलीने लिटनला मदत करण्यास नकार दिल्याने युध्दास सुरुवात<br>➢ अफगाण हरले.<br>➢ शेरअलीचा मुलगा याकुब खाँ व इंग्रज यांच्या मध्ये रांडमक याठिकाणी करार. |
| तिसरे १९१९ | ➢ १९०१ ला अब्दुर्रहमानचा मृत्यु झाला व त्याचा मुलगा हबीबउल्ला गादीवर आला.<br>➢ ब्रिटिशांशी करार करण्यास त्याने नकार दिला. त्यामुळे तणाव निर्माण झाला.<br>➢ इंग्लंड – रशिया मैत्री कराराला हबीबउल्ला याने विरोध केल्याने युध्द उद्‌भवले.<br>➢ ऑगस्ट १९१९ रावळपिंडी कराराने युध्द समाप्त<br>➢ यानुसार अफगाण स्वतंत्र राष्ट्र असल्याचे मान्य करण्यात आले. |







# ब्रम्हदेश युध्द :-

## ❖ब्रम्हदेश :-

१. आलोमपोरा :- या ब्रम्ही नेत्याने १७५० मध्ये पेगूवर आक्रमण करुन तो आपल्या राज्याला जोडला.
२. ब्राम्हण राजाने १८२२ ला महाबुंदेलाच्या नेतृत्वात आसाम जिंकले. मणिपूर जिंकले.
३. चितगाव जिल्ह्यातील डाहापुरी बेट ब्राम्हण आक्रमण झाले. त्याच्या मालकीवरुन युध्द उद्‌भवले.

## ➢ पहिले ब्रम्हदेश युध्द (१८२४-२६) :-



- गर्व्हनर जनरल लॉर्ड ॲमहर्स्ट च्या काळात हे युद्ध झाले.
- मांदाबू करार २५ फेब्रुवारी १८२६
- आराकान व तेनासरीम हे किनाऱ्यावरील प्रदेश ब्रिटिशांना मिळाले. ब्रहयी राजाने काचर, जैनेशिया व आसाम यावरील हक्कांवर पाणी सोडले. मणिपूरच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली.
- 'आव्हा' (राजधानी) येथे ब्रिटिश वकील असावा याला मान्यता दिली.
- ब्रिटिशांना १ कोटी नुकसानभरपाई द्यावी.
- लॉर्ड ॲमहर्स्टला 'अर्ल ॲम्हर्स्ट ऑफ आराकान' ही पदवी.

## ➢ दुसरे ब्रम्हदेश युध्द (१८५२) :-

- गर्व्हनर जनरल लॉर्ड डलहौसी च्या काळात हे युद्ध झाले. १८३७ ला आलेल्या राजा थरावदी याने यांदाबू करार नाकारला. ब्रिटिशांचे नेतृत्व जनरल गॉडविन याने केले. उत्तर बर्मातील टिंबर रिसोर्सेसर ताबा मिळवला. १८५२ ला संपूर्ण पेगू प्रांत ब्रिटिश साम्राज्याला जोडला गेला असण्याची घोषणा डलहौसीने केली.



## ➢ तिसरे ब्रम्हदेश युध्द (१८८५) :-

- १८६२ चा करार स्थायिक होणे, जहाजे इरावतीतून चीनपर्यंत नेणे. १८७१ लंडन सरकार तिसरे ब्रम्हदेशाशी संबंध भारतीय व्हॉइसरॉयमार्फत ठेवले जातील. लिटनच्या काळात वकीलाच्या वागणुकीवरुन तणाव निर्माण झाला. त्यांना माघारी बोलवले व संबंध सुधारण्याचे रिपनचे प्रयत्न निष्फळ झाले.



- १८७८ राजा मिंडनचा मृत्यू झाला. मुलगा थिबा गादीवर बसला. थीबा १८८५ फ्रेंच वकील हास मंडालेला (व्यापारी करार) बँक, लोहमार्ग, लाकूड, खाणींची परवानगी.
- 'बॉम्बे बर्मा ट्रेडिंग कॉर्पोरेशन' ब्रिटिश कंपनी १८८५ राजांशी Royalty वरुन भांडण, उत्तरेत लाकडाचा व्यापार.
- दंड देण्यास नकार. डफरिनने ऑक्टोबर १८८५ ला खलिता पाठवला.
- लष्करी नेतृत्व जनरल प्रेंडरगास्ट राजा हरला.
- १ जानेवारी १८८६ उत्तर ब्रम्हदेश विलीन डफरीनची घोषणा.
- १८१७ - पहिले गर्व्हनरची नियुक्ती.
- १८८६ चीन-ब्रिटन करार तिबेट - ब्रम्हदेश संदर्भात
- १९३५ - ब्रम्हदेशाची स्वतंत्र घटना तयार करण्यात आली.

| कालावधी | तह / महत्त्वाच्या घटना |
|---|---|
| **पहिले**<br>१९२४-२६ | • गव्हर्नर जनरल – लॉर्ड ॲमहर्स्ट मांदाबु कराराने युध्द थांबले.<br>• मणिपुरच्या स्वातंत्र्याला मान्यता, आराकान प्रदेश ब्रिटिशांना मिळाला.<br>• लॉर्ड ॲमहर्स्टला 'अर्ल अमहर्स्ट ऑफ आराकन' ही पदवी मिळाली. |
| **दुसरे**<br>१८५२ | • गव्हर्नर जनरल – लॉर्ड डलहौसी<br>• १८५२ साली संपुर्ण पेगू प्रांत ब्रिटिश साम्राज्याला जोडला गेला. |
| **तिसरे**<br>१८८५ | • गव्हर्नर जनरल – लॉर्ड डफरीन ब्रम्हदेश पराभूत व ब्रिटिश साम्राज्यात विलीन<br>• १९३५ - ब्रम्हदेशाची स्वतंत्र घटना तयार करण्यात आली. |

# प्लासीची लढाई (२३ जुन १७५७)



सिराजउद्दौला



रॉबर्ट क्लाईव्ह

- अलीवर्दीखानाच्या मृत्युनंतर त्याचा नातु सिराजउद्दौला बंगालचा नवाब बनला. इंग्रजांना बंगाल प्रांत हवा होता. म्हणून त्यांनी सिराजउद्दौलाच्या राज्यात हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली.
- १७१७ साली ईस्ट इंडिया कंपनीला मिळालेल्या जकातमुक्त व्यापारी परवान्याचा कंपनीने गैरवापर करु नये असे त्याने कंपनीला बजावले.
- परंतु दक्षिणेत फ्रान्सचा पराभव केल्यामुळे इंग्रजांच्या आत्मविश्वास वाढला होता. त्यामुळे त्यांनी आपला मनमानी कारभार चालूच ठेवला.
- युरोपातील इंग्लंड – फ्रान्स युध्दाचे परिणाम भारतातही जाणवतील या भीतीने ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आणि फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी या दोघांनी बंगालमधील आपआपल्या वखारीभोवती संरक्षक तटबंदी उभारण्यास सुरुवात केली.
- सिराजउद्दौलाने या गोष्टीचा विरोध केला आणि तटबंदी पाडण्याचा आदेश दिला. फ्रेंचानी या आदेशाचे पालन केले. परंतु इंग्रजांनी आदेश न मानल्यामुळे सिराजउद्दौला नाराज झाला.

| बंगालचे नबाब | कालावधी | नातेसंबंध |
|---|---|---|
| **मुर्शिदकुलीखान** | १७१७-२७ | बंगालचा दिवाण झाल्यापासून वास्तविक शासक |
| **शुजाउद्दीन** | १७२७-३९ | मुर्शिदकुलीखानचा जावई |
| **सरफराजखान** | १७३९-४० | शुजाउद्दीनचा मुलगा |

| बंगालचे नबाब | कालावधी | नातेसंबंध |
|---|---|---|
| **अलीवर्दीखान** | १७४०-५६ | शुजाउद्दीनने बिहार प्रांताची जबाबदारी सोपवली. |
| **सिराजउद्दौला** | १७५६-५७ | अलीवर्दीखानचा नातू |
| **मीरजाफर** | १७५७-६० | सेनापती (अलीवर्दीच्या बहिणीशी लग्न) |
| **मीरकासीम** | १७६०-६३ | मीरजाफरचा जावई |
| **मीरजाफर** | १७६३-६५ | बक्सारची लढाई |
| **निजामउद्दौला** | १७६६-७० | |
| **शैफुद्दौला** | | |
| **मुबारकउद्दौला** | | |

❖ **अलीवर्दीखान** – इंग्रज फ्रेंचाना कलकत्ता व चंद्रनगरच्या फॅक्टरीवर तटबंदी बांधण्यास विरोध केला.

❖ **सिराजउद्दौला** - अलीवर्दीचा नातू

- याच्या काळात कृष्णवल्लभ प्रकरण घडले, नबाबाच्या सेवेत असताना कृष्णवल्लभने पैशाची अफरातफर केली. त्याने कंपनीकडे आश्रय घेतला.
- इंग्रज आणि फ्रेंचांनी आपापल्या वखारीभोवती तटबंदी बांधण्यास सुरुवात केली. कारण, युरोपातील इंग्लंड-फ्रान्स युध्दाचे पडसाद भारतात उमटतील या भीतीने सिराजला ही कृती सार्वभौमत्वावर आक्रमण वाटली. त्याने ती पाडून टाकण्याचे व युध्द न करण्याचे आदेश दोघांना दिले. फ्रेंचांनी आदेश मानला परंतु इंग्रजांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे सिराज इंग्रजावर नाराज होता.
- परिणामी सिराजने कासीम बाजार फॅक्टरीवर कब्जा केला. १५ जून १७८६ ला फोर्ट विलियमला वेढा दिला. त्यावेळी इंग्रज शरण आले. किल्ल्याचा ताबा माणिकचंदकडे दिला.

## ❖ कलकत्याची अंधार कोठडी :-

- सिराजउद्दौलाने इंग्रजांना शरण येण्यास भाग पाडले आणि सिराजउद्दौलाने कलकत्त्यावरील हल्ल्यात हाती आलेल्या १४६ युध्द कैद्यांना (इंग्रजांना) छोटयाशा कोठडीत डांबून ठेवले. उष्णता आणि श्वास यामुळे गुदमरुन १२३ इंग्रजांचा मृत्यु झाला. (Black Hole Tragedy) या घटनेबाबत इतिहासकारांमध्ये एकमत नाही.



- याच घटनेचा वापर इंग्रजांनी युध्दाच्या समर्थनासाठी केला आणि सिराजउद्दौलाच्या कुरापती काढण्यास सुरुवात केली.
- युध्दात वर्चस्व राखता यावे यासाठी इंग्रजांनी सिराजचा सेनापती मीर जाफर याला बंगालच्या नवाब पदाचे आमिष दाखवून फितुर केले.

## ❖ अलिनगरचा तह



- इंग्रजांनी हुगळी लुटली. सिराज त्याविरोधात गेला. लढाई अनिर्णित राहिली. या दोघांमध्ये 'अलिनगर' येथे तह झाला.

❑ **तहाची कारणे** :- जानेवारी १५५७ मध्ये अहमदशहा दुराणीचे दिल्लीत आक्रमण झाले. तो बंगालमध्ये आल्यास त्याला तोंड द्यावे लागेल आणि दुसरे कारण म्हणजे युरोपमध्ये सप्तवार्षिक युध्द सुरु होते. इंग्रजांना भीती होती की,
फ्रेंच व सिराज एकत्र आले तर त्यांच्याशी लढावे लागेल.

❑ **तहातील कलमे** :

- इंग्रजांना व्यापारातील पुर्वीच्या सवलती आणि अधिकार मिळाले.
- फोर्ट विलियम (कलकत्ता) तटबंदीस व लष्करी सिध्दीस परवानगी, त्याचदरम्यान मीरजाफर व कंपनी यांच्यामध्ये गुप्त फरार झाला.



- २३ जुन १७५७ 'प्लासी' येथे सिराजउद्दौला आणि रॉबर्ट क्लाईव्ह समोरासमोर येऊन यांच्यात हे युध्द झाले. या युद्धामुळे इंग्रहाना भारतात सर्वप्रथम आपली राजकीय सत्ता स्थापन करता आली.
- सेनापती मीरजाफरच्या फितुरीमुळे सिराजउद्दौला या युध्दात मारला गेला.
- अशाप्रकारे एकही रक्ताचा थेंब न सांडता प्लासीच्या लढाईत इंग्रजांना विजय मिळाला.
- बंगाल प्रांतावर इंग्रजांचा राज्यकारभार सुरु झाला.
- प्लासीच्या विजयाने ब्रिटिशांच्या व्यापारी सत्तेचे राजकीय सत्तेत रुपांतर झाले.
- मीर जाफर बंगालचा नवाब बनला. ब्रिटिशांना मोठया प्रमाणात आर्थिक, प्रादेशिक व राजकीय लाभ झाला.
- या युद्धामुळे बंगालचा नवाब ब्रिटिशांच्या हातातली कळसुत्री बाहुली बनला.
- अशाप्रकारे लॉर्ड क्लाईव्हने भारतात ब्रिटिश सत्तेचा पाया घातला असे म्हणतात. कारण खऱ्या अर्थाने ब्रिटिशांची सत्ता भारतात प्लासीच्या लढाईनंतर स्थापन झाली. ब्रिटीशांचा बंगालवरील विजय हा त्यांच्या भारतातील सत्तास्थापनेचा पाया मानला जातो.

## ❖ मीर जाफर :

- प्लासीच्या युध्दानंतर बंगालचा नबाब झाला. इंग्रजांना २४ परगणे जिल्ह्यांचा प्रदेश दिला. क्लाइव्ह व इतर अधिकाऱ्यांना लाखो रुपये भेट दिले.
- बंगालमधील सर्व फ्रेंच वसाहती इंग्रजांना दिल्या. पुन्हा इंग्रजांच्या अवास्तव मागण्या पुर्ण करु शकला नाही.

## ❖ मीर कासीम – मीरजाफरचा जावई

- इंग्रज व मीरकासीममध्ये तह सप्टेंबर १७६० मध्ये झाला.

❑ **तहानुसार** : कंपनीला वरदान मिदनापूर व चितगाव जिल्हे द्यावे.

- दक्षिण मोहिमेसाठी ५ लाख द्यावे.
- दोघांचे शत्रू-मित्र एकच असतील.
- मीरकासीमला इंग्रजाचे वर्चस्व सहन होत नव्हते. म्हणून त्याने इंग्रजांचे सान्निध्य टाळण्यासाठी राजधानी मुर्शिदाबादहून मुंगेरला नेली.
- मीरकासीमने कंपनीला विरोध करण्यासाठी अवधचा नबाब सुजाउद्दौला आणि मुघल राजा शाहआलम यांची इंग्रजाविरुध्द आघाडी केली.

## बक्सारची लढाई (२२ ऑक्टोबर १७६४)



- मीर जाफर बंगालचा नवाब बनल्यानंतर त्याने ब्रिटिशांना मोठया प्रमाणात आर्थिक व प्रादेशिक साहाय्य केले.
- परंतु ब्रिटिशांच्या मागण्या वाढतच जाऊ लागल्याने त्याची पुर्तता करणे मीर जाफरला अशक्य होऊ लागले.
- त्यामुळे इंग्रजांनी मीर जाफरला पदावरुन काढले आणि त्याचा जावई इंग्रजांनी मीर कासीमला बंगालचा नवाब बनवले.
- मीर कासीम महत्त्वकांक्षी होता. त्यामुळे त्याला इंग्रजांचे वर्चस्व मान्य नव्हते.
- कंपनीच्या मनमानी कारभाराला त्याने विरोध करण्यास सुरुवात केली. त्यामुळे तणावाची परिस्थिती निर्माण झाली.
- मीरकासीमने अवधला जाऊन तेथील सुजाउद्दौला आणि मुघल राजा शहाआलम यांना इंग्रजांविरुध्द संघटित केले.
- २२ ऑक्टोबर १७६४ रोजी मीर कासीम, अवधचा सुजाउद्दौला, बादशाहा शहाआलम आणि मेजर हेक्टर मुन्रो यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश फौजा यांच्यात युध्द झाले.



- या युध्दात ब्रिटिशांचा विजय झाला. अवधचा नवाब आणि मुघल बादशाह इंग्रजांना शरण आले.
- बक्सारच्या विजयाने ईस्ट इंडिया कंपनीला बंगाल, बिहार आणि ओरिसा प्रांतात दिवाणी हक्क प्राप्त झाले आणि कंपनी अप्रत्यक्षपणे राज्यकारभार करु लागली.
- बक्सारच्या लढाईनंतर जुलै १७६३ मध्ये कंपनीने मीर जाफरला पुन्हा बंगालचा नवाब बनविले.
- १७६५ मध्ये लॉर्ड क्लाईव्हची दुसऱ्यांदा बंगालच्या गव्हर्नर पदी निवड झाली.
- बादशहा शहाआलमला दरवर्षी २६ लाख रु. पेन्शन कंपनीने मंजूर केले. त्या बदल्यात बादशहाने कंपनीला बंगाल, बिहार व ओरिसा या प्रांताची दिवाणी दिली.
- इतिहासकार सर स्मिथच्या मते, "बक्सारच्या विजयाने प्लासीचे कार्य पूर्ण केले कारण बक्सारच्या विजयामुळे इंग्रजांचा पाय हिंदुस्थानात पक्का रोवला गेला."
- या विजयाने ब्रिटिशांनी भारतात आपले पाय घट्ट रोवले आणि साम्राज्यविस्ताराला सुरुवात केली.
- इंग्रजांना या युद्धाच्या विजयाने बरीच आर्थिक व प्रादेशिक प्राप्ती झाली.

### महत्त्वाचे सन व घटना यांचा थोडक्यात आढावा भारतातील घटना :

इ. स. १४९८: पोर्तुगीज प्रवासी वास्को-द-गामा भारतातील कालिकत बंदरात येऊन पोहोचला.
इ. स. १५९९: भारताशी व्यापार करण्यासाठी इंग्रजांनी ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली.
इ. स. १६१५: इंग्रजांनी मुघल बादशाह जहांगीर याच्याकडून सुरत येथे वखार स्थापन करण्याची परवानगी मिळवली.
इ. स. १६२५: फ्रेंचांनी भारतात व्यापार सुरु केला.
इ. स. १७५७: प्लासीच्या लढाईत इंग्रजांचा विजय झाला.
इ. स. १७६०: वाँदिवॉशच्या युध्दात इंग्रजांनी फ्रेंचाचा पराभव केला.
इ. स. १७६४: बक्सारच्या विजयाने इंग्रजी सत्तेचा पाया बंगाल प्रांतात घातला गेला.
इ. स. १७७५: इंग्रज व मराठे यांच्यात पहिले युध्द झाले.
इ. स. १८०३ - १८०५: दुसरे इंग्रज-मराठा युध्द
इ. स. १८१७- १८: तिसरे इंग्रज – मराठा युध्द, मराठा सत्तेचा अंत झाला.
इ. स. १८३९: पंजाबचे महाराज रणजितसिंह यांचा मृत्यु
इ. स. १८४५: पहिले इंग्रज-शीख युध्द
इ. स. १८४९: दुसरे इंग्रज-शीख युध्द. शीख सत्तेचा शेवट.

★★★★★★★★★★★★★★★★★★★★